म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५०५
का ७८८३

# मोहर

REFBK-0013468
REFBK-0013468

मराठवाडा कवि संमेलन
नांदेड

१४८५

# मोहर

( प्रातिनिधिक काव्यसंग्रह )

ग्रंथ संग्रहालय ठाणे
९३४६८
शाखा

संपादक मंडळ

दे. ल. म[illegible]

नरहर कुरूंदकर

राम शेवाळकर

कृ. व्यं. हवालदार

REFBK-0013468

REFBK-0013468

मराठवाडा कविसंमेलन
नांदेड.

प्रकाशक :-

मराठवाडा कवि संमेलन
नांदेड,

†

सर्वाधिकारी

कलामंदिर साहित्य समिति
नांदेड.

†

२६ जानेवारी १९६७

मूल्य दोन रुपये

†

मुखपृष्ठ

आर. एस्. कंटक, मुंबई

†

मुद्रक

ग. ना. अंबेकर
गोदावरी प्रिंटिंग प्रेस,
नांदेड.

मराठी रसिकतेस
अभिवादनपूर्वक–

## भूमिका—

कलामंदिराच्या साहित्य समितिच्या वतीनें दोन वर्षांपूर्वी १९ व २० नोव्हेंबर १९६० या तारखांना नांदेड येथें मराठवाडा पातळीवर परिषद्स्वरूप असें पहिलें कविसमेलन आयोजित करण्यांत आलें होतें. नांदेडला भूषणीभूत असे मराठींतलें अेक श्रेष्ठ कवि श्री. वा. रा. कांत हे संमेलनाच्या अध्यक्षस्थानीं होते. प्रा अनंत काणेकर यांनीं समेलनाचें उद्घाटन केलें. संमेलनांत 'आजची मराठी कविता' या विषयावर प्रा. वा. ल. कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालीं झालेल्या परिसंवादांत प्रा. भगवंत देशमुख, प्रा भालचंद्र कहाळेकर, प्रा. स. रा. गाडगीळ व नरहर कुरूंदकर या विचारवंतांनीं भाग घेतला होता. 'महाराष्ट्र कवि' हें पद प्राप्त झाल्याबद्दल कविवर्य यशवंतांचा भव्य सत्कार—हें हि संमेलनाचें अेक संस्मरणीय वैशिष्टच होतें. पाहुणे कवि म्हणून प्रा. वसंत बापट हेहि समेलनाला खास उपस्थित होते. संमेलनांत मराठवाड्यांतील जुन्या नव्या अशा जवळजवळ पाऊणशे कवींनीं भाग घेतला. स्वागताध्यक्ष या नात्यानें मराठवाड्यांतील जेष्ठ व आदरणीय कवि दे. ल. महाजन यांनीं या सर्व कवि व साहित्यिकांचें स्वागत केलें.

संमेलनाच्या स्वागत कार्यकारिणीनें केलेली सर्व परस्थ प्रतिनिधींच्या व कवींच्या निवासभोजनाची नि:शुल्क व्यवस्था, मराठवाड्यांतील तोंपर्यंतच्या सर्व प्रकाशित-अप्रकाशित वाङमयाचें प्रदर्शन, अध्यक्षांच्या हस्तें दोन काव्यग्रंथांचें प्रकाशन, आणि जिल्हा प्रसिद्धी खात्यातर्फें चित्रीकरण व ध्वनिमुद्रण झालेलें नेत्रोद्दीपक योजना कविसंमेलन, हेंहि संमेलनाचें विशेष लक्षणीय होते. सन्माननीय पाहुणे, कवि, प्रतिनिधि, वृत्तपत्रें व नांदेडचे सहृदय दाते यांच्या सहकार्यानें आणि रसिक व निरलस कार्यकर्त्यांच्या परिश्रमानें हें समेलन यशस्वी रित्यां पार पडलें.

या अपूर्व कविसंमेलनाची स्मृति म्हणून अेक प्रातिनिधिक कवितासंग्रह प्रकाशित करण्यांत यावा, या स्वागतसमितिच्या सकल्पानुसार सर्वश्री दे. ल महाजन, नरहर कुरूंदकर व राम शेवाळकर यांची अेक समिति नेमण्यांत येऊन संग्रहाच्या संपादन-प्रकाशनाचें उत्तरदायित्व तिच्यावर सोंपविण्यात आलें. संपादक मंडळानें आपल्या अधिकारांत

कविसंमेलनाचे अेक कार्यवाह श्री. कृ व्यं. हवालदार यांना कार्यकारी सदस्य म्हणून स्वीकृत करून घेतलें.

आम्ही संपादकांनीं मराठवाड्यांतील समग्र अर्वाचीन कविता अेका संग्रहांत यावी म्हणून दिवंगत व विद्यमान अर्वाचीन कवींच्या कविता निवडून घेतल्या आहेत. ही निवड करतांना कवि म्हणून प्रत्येकाचें वैशिष्ट्य त्या कवितेंत उतरलेंच आहे अगर ती कविता त्या कवीची प्रातिनिधिक आहे अशी भूमिका आम्ही घेतलेली नाहीं, जास्तीत जास्त कवींचा समावेश असावा, नवोदितांना अधिकांत अधिक वाव मिळावा व कविता चांगली असावी इतकीच मर्यादित भूमिका संपादकांनीं घेतलेली होती.

संमेलनाला उपस्थित असणाऱ्या कवींच्या चांगल्या कविता निवडल्या. अनुपस्थितांच्याहि मागवून घेऊन या संग्रहांत समाविष्ट केल्या. या खेरीज अधिकांत अधिक नवोदितांचा समावेश होऊं शकला नसता. या संग्रहांतील कविता मराठवाड्यांतील कवींची काव्याची, त्यांतील नव्या वळणाची व या कवींतील सुप्त प्रतिभाशक्तीची ओळख करून देतील असा विश्वास वाटतो

गोदातटाकीचेंच व अर्वाचीन कालखंडांतले अखेरचे संतकवि प. पू दासगणू महाराज यांचा संग्रहास आशीर्वाद लाभला. महाराष्ट्रकवि यशवंत यांनीं आमच्या विनंतिनुसार संग्रहास रसोद्ग्राही प्रस्तावना लिहून दिली, या दोन्ही योगांबद्दल आम्हाला धन्यता वाटते. त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणें आमचें पवित्र कर्तव्य आहे. महाराष्ट्र शासन, जिल्हा लोकल बोर्ड, नांदेड नगरपालिका व कविसंमेलनाचे देणगीदार यांच्या उदार सहाय्यांतूनच हा प्रपंच केला आहे. त्यांचें व संपादकांशीं सहकार्य करणाऱ्या सर्वच कवींचे, आणि स्वागतकार्यकारिणीचे आम्ही मन:पूर्वक आभार मानतों. श्री. अंबेकरांनीं संग्रहासाठी घेतलेल्या विशेष परिश्रमांबद्दल ऋणनिर्देशामध्यें त्यांचाहि आवर्जून उल्लेख केला पाहिजे. रसिक वाचक हा 'मोहर' स्वागतार्ह मानतील, अशी आशा आहे.

मकर संक्रमण, ६३ — संपादक मंडळ

# जवळून जातांना—

आम्रतरूवर फुलणारे पुष्पगुच्छ 'मोहर' ह्या नांवानें ओळखले जातात. तो मोहर एकजातीय असतो. प्रस्तुत प्रकाशनांत अनेक कवींच्या भाव-तरुलतिकांना आलेल्या बहराच्या बानग्या आहेत. तेव्हां, मोहर ह्या एकजातीय नांवापेक्षां पुष्पवाटिका किंवा पुष्पप्रदर्शन ह्यासारखें ह्या कविता संग्रहाचें स्वरूप आहे. उत्तुंग चंपकवृक्षाच्या सोनफुलांबरोबर कोरांटी कण्हेरीही (विजयेंद्र काबरा यांची–'कुणी धावते' ही कविता पाहा) इथें डोलत आहे. प्रभात काळीं दंवबिंदूंनी चमचमणाऱ्या दवलाल्या तृणफुलांची जशी इथें पखरण आहे तशीच नक्षत्रांकित गगनाशी नातें जोडणाऱ्या रातराणीची गंधगदिरताही कितीक कवितांतून कोंदलेली आहे जाई–जुईच्या संभारावरोबर गुलाबाचा दिमाखहि इथें पाहायला मिळतो. हिरव्या चाफ्याचा उग्र गंध देखील इथें (श्री संभुस यांच्या 'फितूर' कवितेंत) जाणवल्यास 'पुष्पप्रदर्शन' ह्या सर्व संग्राहक अभिधानाला परिपुष्टताच येत आहे, असें नव्हे कां? नटला श्रावणमास, गीत, तोऱ्यांत, श्रावण-श्रावण, ह्या भावकलिका जवळून जाणाऱ्या रसिकाला श्रावणशोभेच्या साक्षी देतील. (अर्थात् साक्षी म्हटल्या कीं त्यांत खरे-खोटेपणाची सरमिसळ असते, असा कोणी आक्षेप घेतल्यास त्याला मी काय हरकत घेणार?) पुष्पवाटिकेंत दरवळणारा गंध केवळ कळ्या-फुलांचाच असतो, असें नाहीं कांहीं कुंड्यांतून किंवा वाफ्यांतून अशीं कांहीं रोपें फोफावत असतात कीं त्यांच्या पानांनाही उग्र-मंद वास असतो. तुळस दवणा, मर्वा, ह्यांची कुणाला आठवण कां करून द्यायला हवी ? अमूर्त प्रीत. आणखी ती रात जागी, खुणा, ह्या कविता तसल्याच गुणधर्माची बरोबरी करूं पाहात आहेत, हें

रसिकांना जाणवल्याशिवाय राहणार नाहीं पण हा पाल्हाळ अधिक लांबवण्याची जरूरी नाहीं. रसिकाला ह्याचा प्रत्यय देण्यास हा कवितासंग्रह समर्थ आहे.

अनुक्रमणिकेकडे नजर टाकणाराला दिसून येईल कीं सान-थोरांचीं ही पंगत बसली आहे. डॉ नांदापुरकर, र. लु. जोशी' यशवंतराव कोरेकल अशा नामवंत दिवंगतांना इथें मानाचें स्थान मिळावें हें उचितच होय. श्री. संत दासगणू थोडेच दिवसांपूर्वी परब्रह्मस्वरूपीं विलीन झाले. पण ह्या कवितासंग्रहाचें भाग्य कीं तत्पूर्वी त्यांचा आशीर्वाद ह्याला लाभला आहे. त्याचबरोबर, हा आशीर्वाद म्हणजे कविवर्य दे. ल. महाजन यांचाहि गौरव ठरत आहे आशीर्वादाच्या ह्या व्यर्थीपणामुळें कलामंदिर साहित्य समिति, त्याचप्रमाणें श्री महाजन ह्यांनाही कृतकृत्य वाटावें

श्री महाजनांचा आदर्श नव कवींनीं आपल्यापुढे ठेवावा म्हणजे विकास होईल, असा श्रीसंत दासगणू यांचा अभिप्राय आहे. तथापि, आपलाच संप्रदाय पुढें चालावा असें खुद्द श्री. महाजनही अपेक्षिणार नाहींत. सांप्रदायिकता भक्तीच्या क्षेत्रांत मान्यता पावत असली तरी कलेच्या मंदिरांत ती भूपणावह ठरणार नाही. केवडा आणि गुलाब, ह्यांत कोणी कोणाचा आदर्श ठेवायचा? ज्याचें बळ त्याला. जो तो आपल्या स्वभावें विकसत असतो, आणि तसा तो विकसत राहावा ह्यांतच शोभा आहे श्री. महाजनांचें 'हृद्गत' डॉ. नांदापुरकरांच्या 'नको हिडू गं हरणी' मध्ये अधिक बोलकें झालें असलें तरी तो एक योगायोग गणावा कलेच्या परिसरांत अभिनवता आणि स्वयंप्रभता ह्यांना खरें मोल आहे.

मोहरलें मी मोहरलें मदन रसानें भरलें हो
पर पुरुषीं रत स्वप्निहि अनुचित
परि मी सुकृत केलें हो

असें म्हणणारी 'राधा'–"पापिण तरि मी तरले हो"– अशा उत्कट आनंदांत मश्गुल असली आणि तिचा आनंद अस्सल अनुभूतीचा

असला तरी प्रस्तुत कवीला तो तारणार नाहीं. तसली प्रतीती कवीला आली नसेल असें म्हणायचें नाहीं; पण ती व्यक्त करण्यासाठीं त्यांना 'राधा' आठवावी ह्यांत सांप्रदायिकतेचा वरपगडा दिसतो (ह्या संग्रहांतल्या अशाच सांप्रदायिक अभिव्यक्तीचे आणखी उल्लेख करतां येतील. पण उल्लेख अशाचाच करावा कीं सांप्रदायिकतेचें दडपण बाजूला सारून, उफाळून येण्याचा जोम त्या मूळ बीजांत असावा ! )

आणि समाधान असें वाटतें कीं ह्या वानग्या कवींच्या स्वयंप्रभतेची जाणीव देणाऱ्या आहेत. डॉ. पुरवार, श्री. वा. रा. कांत, प्रा. राम शेवाळकर हे आतां यशःसोपान वराचसा चढून गेले आहेत शेवाळकरांच्या 'स्वयें गोदावरी आली' ह्या कवितेंतला दृष्टिकोन विशेष आहे गोदावरीला महापूर येऊन नांदेड शहरीं तिनें जो धुमाकूळ घातला त्याची विध्वंसक भीषणता, खरें म्हणजे, काव्यविषय व्हायची पण, सीमा सांडून, उग्र रूप धारण करून, तिनें जी आपल्याकडे धांव घेतली ती आपणाला पावन करण्यासाठींच ! रुद्र रूपांतहि मंगलाचा शोध घेणारी ही दृष्टि हृद्य आहे

मागें कोणा गौतमाची
पापें प्रक्षाळून गेली

ह्या प्रारंभींच्या कडव्यांतल्या चरणांनीं

स्वयें गोदावरी आली
माझ्या हट्टी पायापाशीं

ह्या अंत्य चरणांशी केलेली मिळवणी म्हणजे जणुं काय कंठाभरणाचा फासाच.

पण इतका तपशीलवार परामर्ष घेण्यासाठीं प्रस्तावना खर्ची पाडणें बरें नव्हे एव्हढें सांगितलें म्हणजे पुरें कीं येथील भावाविष्कार सकस आहे. ठसे, करमणूक, पांथस्थ, अलीकडे–पलीकडे तूं एक स्वप्न, मनांतले कढ, यमुना, मातीच्या घरांत, असे किती तरी मथळे ह्या अनुरोधानें उल्लेखतां येतील. विनोदालाही इथें वाव मिळाला आहे. श्री वांगीकरांनीं 'खुर्ची' ठेवली आहे–ज्यांना अभिलाषा असेल त्यांनी

तिच्याकडे धांव घ्यावी. आगळेपणानें उठून दिसणाऱ्या दोन कविता सौ. सुमतिबाई उपासनी यांच्या आहेत. "असे कसे पुरुष" ह्या कवितेंत आहे पुरुषवर्गावर टीका! पण त्या टीकेंत कडवटपणा नसून खमंगपणा आहे. कारण, कौतुकाची कढई आणि जिव्हाळ्याचें तेल, ह्यांचा वापर आहे ह्या फोडणीला! सौ. लता बोधनकर यांच्या कवितांतलें हृदयस्पर्शित्व वाखाणण्यासारखें आहे. घरभरल्या संसारांत, त्यांची प्रौढ-वत्सल सासू आपल्या सुनांना म्हणते–

सुखें नांदा जपा नीट सुत फणीचें नाजुक
क्षणीं आम्हां विसाव्याला आणा इवलें कौतुक

काय हळुवारपणा, किती शालीनता, कशी भूल घालणारी सघन सूचकता आहे लताबाईच्या ह्या भाषेंत! असे भावरुचिर बोल निघायला स्पंदनशील खानदान स्त्री हृदयच हवें. लताबाईची 'शिदोरी' देखील अशीच रसोत्कृष्ट आहे. माहेरीं आलेल्या लेकीला आई क्षेमकुशल पुसते आहे. सासरीं मुलीला कांहीं दुखतं खुपतं, सलतं कां, हें जाणून घ्यायचंय आईला. सासरच्या सगळ्यांचं वागणं अगदीं मनपसंत असेल तर तें सासर कसलं! पण कुलवंताची कन्या एकदम तसं कसं सांगून टाकील? तीच उलट आईला म्हणते–

प्रश्न अनोळखी असे नको विचारूं गं आई

आणि आई अधिक खोदखोदून विचारील म्हणून लगेच पुढें म्हणते–

उकळतें उकळूं दे आंत आटेल आधण
झाकण न काढी आई हात भाजेल वाफेनं

ह्या दृष्टान्तानें स्तिमित होणार नाहीं असा वाचक विरळा. स्त्रीची मनोधारणा इतक्या अप्रतीमपणें अन्यत्र व्यक्त झालेली नसेल! आणि स्त्रीजीवनांतूनच असला दृष्टान्त उफाळायचा!

अशा ह्या कवितासंग्रहाची समाप्ति श्री. हरसूलकर यांच्या भैरवीनें व्हावी ह्यांत औचित्याचा उत्कर्ष आहे. अन्तःकरणांत

ढवळायला लागावें, अशा आशयाचे आर्त सूर इथें घुमत आहेत. हें सारें करुण-मधुर-व्यथित भावसौंदर्य पाहून मी मनांतल्या मनांत बोलून गेलों कीं–

कुठें कणिका चमके कुठें थरथरे बिंदू
कुठें एका उद्गारांत उसळती सात सिंधु

पण माझ्या ह्या उद्गाराशीं कोणी तितका सहमत झाला नाहीं तरी–

ध्वनींना कोंभ फुटतात शब्दांच्या तारेंतून
कुठें कळत न कळत सूर गळतो अशा कोवळ्या पानांतून·
सावल्यांत जुळतात शत स्पर्शांच्या फुला-कळ्यांनीं
गंधाच्या ओळी झरतात ओठांच्या ओंजळींतून.
विलगतात नवीं पानं वाऱ्याच्या झुळकीनें
कुठें हुकतात चुकतात खुणा तुझ्या नव्या ओळींतून.

हे श्री. गजमल माळी यांचे बोल (अन्य कोणत्या अनुभूतीचे असले तरी) ह्या एकंदर कवितासंग्रहाबाबत वाचक मान्य करून घेईल असा विश्वास वाटतो.

पुणें २
१-१-६३

**यशवन्त दिनकर पेण्ढरकर.**

## कवि संमेलन कार्यकारिणी

स्वागताध्यक्ष :

श्री दे. ल. महाजन

कार्याध्यक्ष :

प्रा. के रं शिरवाडकर
श्री. ग. ना. अंबेकर
सौ सरलाताई वाळवेकर

कार्यवाह :

श्री कृ. व्यं हवालदार
प्रा राम शेवाळकर
श्री. चं ग. प्रधान

कोषाध्यक्ष :

श्री नरहर कुरुंदकर

सभासद :

सीतारामपंत पप्पू
प्रा. स. रा गाडगीळ
श्री. गंगाधर शक्करवार
श्री. जयत देशपांडे
डॉ. नाडकर्णी
डॉ ना. य डोळे
श्री. अमृत देशमुख
सौ. प्रमिलाताई भालेराव
सौ. कमलाबाई बिदरकर
श्री गजमल माळी औरंगाबाद,
श्री. वि. भा. पाठक, परभणी
सौ. सुहासिनी इर्लेकर उस्माना.
श्री. राम मुकादम मोमिनाबाद

## कलमंदिर कार्य समिति

ट्रस्टतर्फे :

श्री. भ. रू. गांजवे अध्यक्ष
श्री. ग. ना. अंबेकर चिटणीस,
श्री रंगराव जालनेकर सभासद

संगीत उपसमिति :

श्री. अ. ह. गुंजकर
श्री. आनंदीदासराव लव्हेकर
श्री मनोहरराव कांडलीकर

नाटच उपसमिति :

श्री. स. रा. गाडगीळ
प्रा. श्री. राम शेवाळकर
श्री. पद्माकरराव लाठकर
श्री. बाबुजी कल्याणजी

साहित्य समिति :

प्रा. शिरवाडकर
डॉ. ना. य. डोळे
श्री. नरहरराव कुरुंदकर

चित्रकला समिती :

श्री त्र्यंबकराव वसेकर
श्री. सीतारामपंत पप्पू

□ □ □

कीं हे अमृताचे मेघ वोळले
कीं हे नवरसांचें वोघ लोटले ।
नाना सुखांचें अंचबळलें
सरोवर हें ।

- रामदास

# अनुक्रमणिका


१ पू दासगणू महाराज
आशीर्वाद ५

२ नारायणराव नांदापूरकर
माझी मराठी ६

३ पद्माकर
प्रतिभेस ७

४ बी. रघूनाथ
सय झाली ग ८
चंदनाच्या विठोबाची ९

५ दे ल. महाजन
अभिनव स्वर्गसोपान १०
हृद्गत १२

६ य. स. कोरेकल
शारदागायन १३

७ र. लु. जोशी
प्रात:स्मरण १६
वागीश्वरीस १८

८ नारायणराव नांदापूरकर
नको हिंडू गं हरणी १९

९ यादवसुत
शनवारवाडा २०

१० पार्थिव
रहा माझ्या सोबतीला २१
निर्धार २२

११ कृष्णाकुमार
गडे ऐकवावें २४

१२ श्री. रा. देव
तुलना २५

१३ कृष्णाकांत
सहानुभूति २६

१४ वसंत शा. वैद्य
अशीच २६

१५ डॉ. शं जा पुरवार
वेडा २७
सखोस २८

१६ रा. लि. मैंदरकर
आटापिटा ३०
संकीर्तन ३१

१७ वा. ग. हरसूलकर
भैरवी ही छेडली ३२
रुबाया ३३

१८ वा. रा. कांत
मिठी ३४
चकमक झडली आहे ३६

१९ यशवंत कानिटकर

| | |
|---|---|
| गच्च रात्रीच्या कुशींत | ३९ |
| ठसे | ४० |

२० राम पिंगळीकर

| | |
|---|---|
| श्रावण मास | ४१ |
| हुरहूर | ४२ |

२१ गोपाळ वांगीकर

| | |
|---|---|
| गृहणी आणि पाकशास्त्र | ४३ |
| खुर्ची | ४५ |

२२ गोपाळ काळे

| | |
|---|---|
| करमणूक | ४६ |
| कवितेचा पाठ देतां | ४७ |

२३ राम शेवाळकर

| | |
|---|---|
| उपकार | ४८ |
| स्वयें गोदावरी आली | ४९ |

२४ गजमल माळी

| | |
|---|---|
| खुणा | ५० |
| मोजीत पाकळ्या उभा | ५१ |

२५ सौ. सुहासिनी इर्लेकर

| | |
|---|---|
| पथदीप | ५२ |
| आला पंचमीचा सण | ५३ |

२६ वसंत तुळजापूरकर

| | |
|---|---|
| वर्षा | ५४ |

२७ शं. श्री. वाशीकर

| | |
|---|---|
| माय बोली मराठीच | ५५ |
| श्रमणाऱ्या हातांनों | ५६ |

२८ सौ. प्रमिलाताई भालेराव

| | |
|---|---|
| भाऊबीज | ६० |

२९ शिवाजी गऊळकर

| | |
|---|---|
| दिशा | ६३ |
| मूढ | ६४ |

३० त्र्यंबक वसेकर

| | |
|---|---|
| राधा | ६५ |
| घार | ६७ |

३१ रवींद्र बोरगांवकर

| | |
|---|---|
| पांथस्त | ६९ |
| लिलांव | ७० |

३२ मधु कुरुंदकर

| | |
|---|---|
| अलीकडे पलीकडे | ७१ |

३३ घन:शाम जोशी

| | |
|---|---|
| एक उललेली शेंग | ७३ |

३४ नरहर कुरुंदकर

| | |
|---|---|
| तूं स्वप्न एक | ७४ |

३५ रा. स. देशपांडे

| | |
|---|---|
| तुज संबोधन कसें करावें | ७५ |

३६ श्रीकांत सदावर्ते

| | |
|---|---|
| खटचाळ ओढा | ७७ |
| असंख्य लाटा | ७८ |

३७ तु शं. कुळकर्णी

| | |
|---|---|
| धुंडित फिरतों माझें | ७९ |
| मनांतले कढ | ८० |

३८ सौ सुमति उपासनी

| | |
|---|---|
| असे कसे पुरुष | ८१ |
| सुसरबाई सुसरबाई | ८३ |

३९ श्री. दि. इनामदार

| | |
|---|---|
| आले आले ज्ञानदेव | ८६ |
| हरली गवळण | ८७ |

४० ना दि. देशमुख
हिरवीं गाणीं ८८
माझ्या मरणाचें गान ९०
४१ विजयेंद्र कावरा
कुणि धांवोत तयामागें ९१
४२ सौ. लता बोधनकर
सासूचें मन ९२
शिदोरी ९३
४३ लक्ष्मीकांत तांबोळी
व्रत ९४
४४ हरिहर मातेकर
बाधा ९५
गीत ९६
४५ नरेंद्र चपळगांवकर
यमुना ९७
४६ राम मुकादम
तोऱ्यांत ९८
४७ हेमचंद्र धर्माधिकारी
तेव्हां, आतां ९९
४८ गिरीबाल
तूं १००
चित्त हांसतें पंकज. १०१
४९ सौ. मीनाक्षी शिरवाडकर
जीवनलहरी १०२
अमूर्त प्रीत १०३
५० पं. श्री. संभूस
फितूर १०४
तूंच पुढें पाऊल टाक १०५
५१ सनपूरकर
भाऊबीज १०६
५२ भास्कर भोळे
रात्र होउनी आलेली तूं १०७
५३ भुजंग वाडीकर
आणखी ती रात्र जागी १०८
जाणीव १०९
५४ शाम अग्रवाल
तुझ्या अडेल ओठांत ११०
५५ राजा मुकुंद
येतां हिर्वाळून कळ १११
५६ अंकुश
वाटेवरची बोर ११२
५७ माणिक मोताळे
प्रेमा तुझ्या आगमनें ११४
५८ चंद्रकांत पाटील
श्रावण श्रावण ११५
५९ लक्ष्मीतनया
सांजवात ११६
६० मु. क्रु गायकवाड
वाट ११७
६१ भगवंत क्षीरसागर
तमांतील पायवाट ११८
६२ प्रभाकर देशपांडे
अशी अचानक ११९
६३ भं. ना. वाघमारे
मातीच्या घरांत १२०

६४ विठ्ठल देशपांडे

रेंगाळते दारामध्यें १२२

६५ इंद्रराव पवार

आसूं १२४

६६ यशवंत पत्की

घट १२५

६७ सुरेश मुळावेकर

प्रार्थना १२६

६८ सतीश महाजन

इरिंग मिरिंग १२७

६९ अ. स. देशमुख

नवा मनु नव्या दिशा १२८

७० अनंत जगताप

प्रतिभेस १२९

७१ रामकृष्ण डिघोळकर

आज आहे श्रद्धा १३१

७२ हरिकिशन राठौर

पुन:प्रत्ययाच्या क्षणीं १३२

७३ रघु बोरगांवकर

ऑफिसचा रंग १३३

७४ सौ. कुंवरदेवी राठौर

हें त्यांसी कां नच कळे १३५

७५ मधुकर चिखलिकर

नयनाच्या दर्पणांत १३६

# आशीर्वाद

श्रीगणेशायनमः ।। हे श्री भीमातटवासिया । नमन माझे तुझ्या पाया । मायबापा पंढरिराया । कृपा करी गणू-वरी ।।१।। कवि संम्मेलन नांदेडांत । जें झालें पहा सत्य । त्या काव्य संग्रहाप्रत । वाचुनिया पाहिलें । २ । महाजनांची कविता । सरस वाटली चित्ता । साहित्यक्षेत्रांत योग्यता । खचित त्यांची थोर असे ।। ३ ।। पूर्ण कृपा सरस्वतीची । महाजनावरी आहे साची । त्या शिवाय अशा काव्याची । उत्कृष्ट रचना होणें नसे ।४। नव कवींच्या कविता । वाचुनिया पाहतां । त्या त्या परिनें तत्त्वता । बऱ्या वाटल्या मानसीं ।।५।। त्या नव कवींनीं । महाजनांचा आदर्श मनीं । ठेवावा पूर्णपणीं । म्हणजे विकास होईल । ६ । हाच संदेश दासगणूचा । मनीं आपल्या धरावा साचा । शुभाशीर्वाद पांडुरंगाचा । लाभो तुम्हा सर्वांसी ।। ७ ।।

पुंडलिकवाडी वजीराबाद<br>नांदेड.<br>गुरुवार श्रावण शु. १५- १८८४

सकल संतांचा चरणरज,<br>**दासगणू**

# माझी मराठी

माझी मराठी असे मायभाषा, हिच्या कीर्तिचें तेज लोकीं चढें
गोडी न राहे सुधेमाजी आतां, पळाली सुधा स्वर्गलोकाकडे!
आजन्म युद्धे! तरी संगरीं जी कधीं भागली नाहीं एक क्षण
द्या आश्रया वा न द्या या सतीला, असे लाधलें एक सद्वीक्षण
ही कामरूप प्रसंगानुरूप, स्वरूप स्वयें पालटे भामिनी
घेतीं पुनर्जन्म सारीं पुराणें, त्यज्यूनी स्वर्गावर्ण काया जुनी
जाईजुईची कळीं कोवळी ही, परी साच झेलील हेमाद्री।

फोडूनिया भ्रांति, निर्मील माझी मराठीच शून्यांतुनी क्रांतिला
आम्ही मराठे हिचे पुत्र लोकीं, कधीं भ्यावयाचें मूळीं ना कुणा
आकंठ प्यालों हिचें दुग्ध अंगीं, पहा रोमरोमांतुनी या खुणा
तोडा चिरा दुग्धधाराच येती, न हें रक्त वाहे शरीरांतुनी
'माझी मराठी मराठाच मीहि' असे शब्द येतील हो त्यांतुनी
वेंचीन वाणी हिच्या वर्णनी मी, अशीं गाऊनी गोड गाणीं सदा
ऐकोनिया स्फूर्ति खेळेल लोकीं, पुन्हां लंघुनी जावया नर्मदा!

ना. गो. नांदापूरकर.

# प्रतिभेस

देवी, तुझ्या आगमीं मन्मती हो
विशुद्धी सुधासाम्य येओ तिला
स्वर्लोक भूलोक पातालिचीहि
निगूढें पुढें ठाकती दृष्टिला !

चैतन्य जें सर्व विश्वीं वसें तें
स्वयें दाविशी तूंच मातें तरी
अेका तुझ्या दर्शनें पावने गे
मला लाभ होती अनेकापरी !

- पद्माकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१३४९९

# सय झाली गं

सय झाली गं
सय झाली गंऽ सय झाली
अुलगडलें सहजीच मनोदळ
रुमरुमली स्वप्नांतिल चलबिल
नीरव अेकांतास लहडली
सळसळ सुमगंधामधली
सय झाली गं ऽ सय झाली

- बी. रघुनाथ

# चंदनाच्या विठोबाची माय

चंदनाच्या विठोबाची
माय गांवा गेली
पंढरी या ओसरीची
आज ओस झाली.

कोनाडयांत अुमडून
पडें घरकूल
आज सत्य कळों येअी
दाटीमुटींतील

कांहीं दिसे भरलेलें
रित्या बोळक्यांत
गवसलें आजवर
जे न रांजणांत !

— बी. रघुनाथ

# अभिनव स्वर्ग-सोपान

विश्व जनता सकल शांति वांछी मनीं ।। धृ० ।।
शांति नाहीं मनीं, शांति नाहीं जनीं
शांति नाहीं वनीं, पाहतां शोधुनी
रुसुनि लपली कुठें जलदिं जशि दामिनी ।।१।।

वेंचूनी संपदा टळति ना आपदा
किति सभा परिषदा भरविल्या सर्वदा
शांति परि ना मिळे, विविधशा साधनीं ।।२।।

दुर्बलांसह प्रबल सज्जनांसहित
वेंचुनी बुद्धिबल करित बसतीहि खल
चुकुनि छाया तिची नच दिसें लोचनीं ।।३।।

शांति नच भूवरीं निश्चयानें खरी
स्वर्गधामीं करी वास गगनांतरीं
म्हणुनि आवाहना करिति जन गर्जूनी ।।४।।

"शांति! ये शांति ! ये देवते ! तूं स्वयें
त्वां असा हा बये । अंत पाहूं नयें
नेत्र थिजले पहा वाट तव पाहुनी" ।।५।।


करुनि आवाहना शांति परि येइना
कुठुनि ही देईना सुखद आश्वासना
तरिहि आशा नवी उदित हृदयांतुनी ॥ ६ ॥

जे उपासक तिचे म्हणविती जातीचे
धीर त्या ना रुचे मार्ग अभिनव सुचे
उलट ते सांगती शांतते लागुनी ॥ ७ ॥

"देवते ! तूं स्वयें आमुच्यास्तव बये !
कष्ट घेऊं नये येथ येऊं नये
येऊं आम्हीच तव दर्शना येथूनी ॥ ८ ॥

मार्ग तो हा नवा देऊं बलि मानवां
कोटयवधि त्या जिवां रचुनिया तच्छवा
स्वर्ग - सोपान करुं सुगम हा योजुनी" ॥९॥

—दे. ल. महाजन



# हृद्‌गत

हृद्‌गत तें झांकुनि कां जाय झांकलें ॥ धृ ॥
सरसावुनि पदर वरी
ढकलूनि दे त्यास परि
यत्न तुझा करुनि विफल
वंचितसे तरिहि तया त्वां न जाणिले १.

विकसित जे भाव मनीं
प्रतिबिंबित जरि आननिं
परि हृदया धीर कुठुनि
आधिच कां सरसावुनि व्यक्त जाहलें २,

लावुनि पदरा टांचणि
करिसी कां अशी जांचणि
की तूं घेसी चांचणि
रसिकत्वची शोधकांत कितिक सांचलें ३.

होउनि नासाग्र दृष्टि
करिसि तूंच सतत वृष्टि
कां मग गे होसि कष्टि
पुष्टींतच त्यास तुष्टि कां न तुज कळे ४

तव मानस मंदिरांत
द्वारपाळ हे तटस्थ
कीं मानस सरसिं हंस
विहरुनिया अैलथडीं सहज पातले ५.

वद तो नलराज कोण ?
ज्यास्तव हे हंस दोन
घेउनि संदेश तुझा
अूर्ध्व मुखें करुनि डुलत अुडत चालले ६.

मानिसि जरी रतिच मूर्त
भीति तुझी ही किमर्थ
साधुनि अभिजित मुहूर्त
करगत जरि पंचबाण स्पर्श पावलें. ७.

–दे. ल. महाजन



करी स्वन न शारदा धरुनि मंजू वीणा करीं
तरीहि मधु मौन कां गमतसे निसर्गांतरी
दिसे न जरि ओष्ठही लव तदीय हाले असे
तसेंहि तरी हो म्हणा मधुर काव्य ही गातसे

म्हणेल कुणी 'चित्र हें, मम' विचित्र कीं सांगणें
गणेल तरि सांगतों परि असे असें मागणें
कसेंहि मम सांगणें क्षणभरीं तरी मागणें—
खुशाल मग कल्पनीं रमुनियां मनीं डोलणें


किती हृदय पाकळ्या फुलवि नित्य काव्योद्धता
कितीक कवि हंसही जगवि शारदा मुग्धता
मृणाल बिस जीवनीं रसिकभृंग गुंजारवें
जगास करि थक्क कां? परि न हें मुखें सांगवें

कराल निज प्रश्न हा जरि मनोमयूरास तो
कसा त्रिभुवनासही विसरूनी पहा नाचतो
नका भलतसे गणा मुळि नसे सहस्राक्ष हा
असा रसिक नाचतो नच तयास त्याची स्पृहा

कुठें विषयमग्न ती शचिपती मुखा दाखवी
कुठें हृदय भग्न वा विषयरूप ऐसे कवी
सुकाव्य रसरूप जें तरिच देहभाना मुके
असोनि मधु–बोलके म्हणविती सदाचे मुके

तरीच मधु ऐकती सतत देवि वीणास्वना
स्वयें बनुनि चित्र तें श्रवति शारदागायना
निवांत मग नाचती मुळि न जागिचें हालतां
मयूरहि तयास ना दिसत चित्रिचा नाचतां

-यशवंत सदाशिव कोरेकळ



# प्रातःस्मरण

प्रभातीं स्मरे मायबोली तुला
अभावीं तुझ्या जीव धादावला
न ये बोल कानीं कुठोरी सहे
तुझ्यावीण कंठू कसें आयु हें
घुमे अन्य बोली सभोंती अहा
पुरी लाघवी कोण चाले चहा
न सोसे मला भाव हा वेगडी
तुझी मात्र भावे गिरा रांगडी
तुझी सह्यपोटीं वसे गे कुळी
तुझा पाळणा आंदुळे कातळी
उभीं शैलखंडें तुझे सोबती
तुला साथ देतां दिला हालती
तुझा साद झेलोनिया पत्थर
मुदें फेकिती डाव वाऱ्यावर
दुणावें तिणावें बलें वैखरी
खुले जैं गुजांची तुझी पोतडी
मना वेड लावी तुझी गारुडी
तुझी रम्य पुंगी सूरा आळवी
डुले नाग तैसा मराठा कवि

तुझा स्पर्श रुजवी नवी पालवी
तुझी मुग्ध जादू मना हालवी
स्फुरे वीर्यशाली सुरांची गती
तुझा ताल साधी पुरी संगती
तुझी साथ लाभो सदा गे मला
स्फुरो मद्गिरा मंगला निर्मला
रहस्यें तुझीं झांकलीं व्यक्तवी
तुझा भाट गाईल गाणीं नवीं
तूं वल्लभा मम जिवाची सखी
तुझें नित्य गुणगान बसले मुखीं
सये ! अंतरीं भाव कोंदाटले
तुझ्या रंगणीं रंग रेखाटले
धरीं हा जरा जीर्ण वीणा करीं,
मनो मोहिनी साजणें सुंदरी
फिरे अंगुली तैं हले अंतर
' तुझाऽऽऽ मी ऽऽऽ तुझा मी ऽऽऽ विनोदें स्वर

-कै. रावसाहेब र. लु. जोशी.



# वागीश्वरीस

सती शारदे चंचले वीर्यवाही अम्हां भावुकांच्या अये पक्षिणी
फिरे जेधवागे तुझी स्वैर कांडी उफाळे मनीं मुग्ध मंदाकिनी
प्रवाहीं तुझ्या क्रीडतां भोग माझे कसे मंदुनी पार ओशाळती
तुझे देखुनिया चमत्कार नाना भ्रमें भांबवे भाबडी मन्मती

इशारें तुझ्या मंत्रुनी भारलेले छुपे शब्द येती कसे धावूनी
अलंकार शृंगारुनी प्रास सारे कसे वाकती गे तुझ्या सेवनीं
तुझ्या स्पर्शमात्रें अहा शब्दसृष्टी कशी रम्यरूपा नव्या पावली
कसें नांदुनी दिव्य संगीत चालें जणूं स्वर्ग हो हा उभा भूतलीं

तुझा वीर झंकार कानीं पडें तैं मराठा कसा चेकळे चेतुनी
त्वरें सांडुनी फूट सारूप्य साधी महाराष्ट्र सत्वाचिया रक्षणीं
अशी संघशक्ती जरा विस्कळाया असे काय प्राज्ञा कुणाची तरी
विभांडूनि वैरी स्थिरावील अंतीं अहा भारता वैभवाच्या शिरीं

तुझी ओढ नाहीं असे कोण ऐसा किती ही जरी रुक्षता रोधवें
तुझी झोंबता धार पाषाण गाळी झणीं आर्द्र होवूनियां आंसुवें
तुझीं चेतता अंतरीं दिव्य ज्योती भरे भूर्त चैतन्य या जीवनीं
पळे धाकुनी दूर वैफल्य सारें खरो गे खरी तूंचि संजीवनी

कै. रावसाहेब र. लु जोशी

# नको हिंडू गं हरणी

चल बाई घराकडे । नको फिरूं भिरीभिरी
तुझा रेखिव गं बांधा । दृष्ट होते घडोघडीं । १ ।
घट अमृताचें बाई । झांक पदराखालतीं
मोहिनीला पाहुनिया । दुष्ट दैत्य शाप घेती । २ ।
नको सोडूं गं मोकळे केस तुझे पाठीवर
पाश वरूणाचें जगीं । सांगु तुला कोठवर । ३ ।
नको हंसुनिया बोलूं । हिरकण्या चकाकती
चोर उभे चहूंकडे । घात कराया टपती । ४ ।
जपोनिया चाल बाई । खळी गालाला पडती
अभावितपणें किती । जगी अनर्थ घडतीं । ५ ।
जपोनिया चाल बाई । नको पाहूं कुणीकडे
पद्मीनीच्या लोभासाठीं । राजहंस मागे पुढें । ६ ।
चल जपोनी सरीते । पाणी नवतीला चढें
वाट खडकाळ मोठी । पुढें तुटलें गं कडे । ७ ।
काय जाणो कशासाठीं । शीळ घुमे वाऱ्यावर
संध्या कपोलीं रंगती । जरी घातला आवर । ८ ।
नको हिंडू गं हरणी । पदर गं फडफडे
ऊर माझा धडधडे । चाल बाई घराकडें । ९ ।

—कै. डॉ ना. गो. नांदापूरकर.

# शनवारवाडा

पाहतां तटा ! तुज, मातें स्मृती पूर्व झाली
सहज वरी वळलेली ही दृष्टि खिळे खाली
चमकले जिथें तेजानें हिरे मोठ मोठे
आज हाय ! दिसती तेथें हीन गारगोटे
दृष्टि आड दडले आतां पाहूं त्यास कोठे ?
वाहतात दुःखाश्रूंचे ओघ या कपोलीं !
जिथें वागल्या विजयानें विक्रमी विभूती
शौर्यचिन्ह जरि पटका तो फडकलाच भूनीं
ध्वजविहीन मृण्मय ऐसे स्तंभ साक्ष देती
गमति जणूं ललना, ज्यांच्या तिलक नसे भालीं !
स्तंभ हे न वंश वनींचे भासतात दोन
वायु येत भेटायातें त्याकडे वळून
शब्द अल्पमात्र निघेना तन्मुखामधून
जणूं आज त्यांच्यावरती प्रेतकळा आली.
निजामास त्या बाजीनें दापिलें इथोनी
चालली इथें नानांची लेखणी शहाणी.
सज्ज इथे कळस नेलें बाल माधवांनीं
हाय ! दुर्ज्या बाजीनें परि काय दशा केली !
पुसट पुरातन वैभव हें दिसतसे अम्हांला
परी तेहि जाऊं पाहें आजला लयाला
होतसे बगीचा येथे हवा खावयाला
फुले हुंगुनिया व्हावें कसें शौर्यशाली !

*यादवसुत* ( राजेश्वरराव मुळावेकर )

# रहा माझ्या सोबतीला

आलेले भराशीं, देवारे ! कणीस--
मोडूनी दयाळा लाविसी भिकेस
मळा पिकविला माझ्या भावनेचा
बिंदु बिंदु माझ्या गाळून श्रमाचा
बडेजाव कधीं फुकाचा न केला
सांठवणीं देशी तरी कां पाचोळां ?
कष्टूनी मातींत मिळविला हात
भाग्या ऊत येई सांडे काठोकांठ
तेज अणू अणू माझ्या जोंधळ्यांचे
नूर उतरवी मोती माणकांचे
टाकायास माप भरतांना गोणी
दुजा भगवंता आणू कोण धनी
असूंअसूंतोनी आऊरलें हासूं
बोलवितां तुज वाहविशीं आसूं
माप खोटें काय ? मला न जाणीव
म्हणोनी ठेविशीं नशीबी उणीव
पाउला पाउला पाय कांचावतो
श्वास सोडतांना जीव जाजावतो
आण वेळोवेळी पेरिलेली चूक
वैर साधिते ती नासुनिया पीक
भावी नांगरणीं कणीं कणी यश
रहा रुजवोनी माझ्या सोबतीस
कण कण घेई मोजुनी तूं रास
तुझ्या श्वासांतोनी स्फुरो माझा श्वास

*पार्थिव* ( श्री ह. का कुलकर्णी )

# निर्धार

दाराला कुलूप देऊं कशी थाप
झांकिलेस रूप काळोखीं कां ?

पाण्याविण कूप दाण्यावीण सूप
खडे कां अमूप पाखडाया ?

अफाट अंधार तुडवूनी वारा
होती येरझारा सोंग कां हे ?

सतीला भ्रतार देऊनी आधार
ओढिशी पदर कसा बारे ?

भवाचा पसारा वृथा हा डोलारा
सागरही खारा जीव द्याया ?

धनावीण साव घरावीण गांव
नांवाचा तूं देव उगा उगी.

बुडवून जीव घांवावर घांव
करुनी, न ठांव, कुऱ्हाडीनें.

थेट आरपार फोडून डोंगर
काढिला निर्झर विखारी हा.

विजेचें बेगड ढगावर गोड
चंद्राचें अभ्रक कालवुनी.–

केलें मी मखर, घालीशी चादर
थडगें तूं अखेर करुनिया

आलों हुरळून घरटें तें मोडून
तुज विश्वासून नश्वरा रे!

माझ्या बाभळीचा सूर्यकर–जाला
पांघरून, झोला संध्या देई

तुझाच अघोरा। लागुनिया वारा
सोडितां सुस्कारा भरे कांटा !

प्रकाश अंधार यांतील अंतर
काढून, कबर बांधा तेथें

भक्तिभाव–लांच खाऊनिया वांच
चुकेल न ठेंच जाशीं कोठें !

पापाचा सागर तुझ्या माथ्यावर
सोडवीन धार अमृताची

असारांत सार राखेंत भास्कर
काढीन, निर्धार, युगांतरीं

35:310

पार्थिव (श्री.ह. का. कुलकर्णी)

# गडे ऐकवावें

'गडे ऐकवावें मजला गान एकदां तें
गान कुशल म्हणुनी लोकीं वाणितात जे ते
मुधाखंड फुलला म्हणती गृहिणी 'दीप' गातां
होय आणि अमृतझरणी 'मेघ' आळवीतां
हंसुनि फुल्ल झाल्या लतिका प्रभातासवें त्या
विविध ताप पाप मनीचें परिसतां हरितें
गडे! ऐकवावें मजला गान एकदां तें" १
हट्ट असा घ्यावा तीनें रोज परी कांही
खंति मुळीं त्याच्या हृदया वाटलीच नाहीं.
हंसुनि शून्य चित्तें नुसती दृष्टि मेळवावी
बोल असे जावें तीचें विरुनि वायुवाटें
'गडे ऐकवावे मजला गान एकदां तें' २.
दिवस कितिक गेले ऐसे आणखी निघून
एक दिनीं भरला तिजला ताप फणफणून
आणि यांत आला तीचा अंत तो घडून
शब्द परी शेवटचेही हेच तिचे होते
'गडे! ऐकवावें मजला गान एकदां तें' ३
स्मशानांत आज तियेंची चिता धडकलेली
अश्रु कुणी ढाळित बसले आप्त भोंवतालीं
दिसे आणि गायनि त्याची तंद्रि लागलेली
ध्वनी तेच कानीं त्याच्या उठति सारखे ते
'गडे! ऐकवावें मजला गान एकदां तें' ४.

**कृष्णाकुमार** (श्री के. गोळेगांवकर)

# तुलना

भव्य अैसें गगन तूं हि
क्षुद्र तारा एक मी
अुदधि असशी घोर तूं ही
वारि त्याचा एक मी
मधुर गमसी गान तूं ही
ताना त्याची एक मी
सर्व ऋतुचा नाथ तूं ही
कुसुम आहे एक मी
करुणमय तूं जलधि असशी
मीन आहे एक मी
माणिकाची खाण तूं ही
दगड आहे अेक मी
मी तुझा हें समज माते
देई शांती मानसीं
सोडूनीया तूं दयाळा !
शरण कोणा जाअूं मी
कमल अुमले क्षणभरीं कां
सूर्य नसतां अंबरीं
तेवि नसतां साह्य तूझें
राहुं कैसा देवराया

- श्री. रा. देव
अुस्मानाबाद

# सहानुभूति

दुःखाचा अतिरेक कांही घडतां जातां वदाया कुणा
तापाचें परि आपुल्या मजपुढें रेखाटितो चित्र तो
शोकाचें कढ काढूनी हृदय हें ओपीत जातां कुठें
दावाया मज तो रडूनि कथितो कोपास ईशाचिया
वेडे हें मन धावतें हृदयिच्या दुःखास ओकावया
प्रेमें देत सहानुभूति परि ना कोणी निवाया तया!

— कृष्णाकांत

□□□

# अशीच

अशीच बसलिस गुडघे मोडून
पदर लपेटुन कटिप्रदेशीं
अशीच हंसलिस लाजलाजुनी
प्राजक्ताच्या पसरित राशी
अशीच वदलिस, जशी नभींची
वीज कडाडुन यावी खालीं
पुरता दिपलों तुझ्या द्युतीनें
चमकशील कां नित्य महालीं ?

वसंत शा. वैद्य,

# वेडा

कोण मी पुसशी अुगी कां, आपदांचा मी गिरी ।
काव्यदेवीचा पुजारी, मी असे कोणी तरी ।। धृ०।।
गंध नाहीं, रूप नाहीं, ज्यांत नाहीं माधुरी ।
वाळलेलें पुष्प असतें, मी असे भूमीवरीं । १ ।
योग्यता ना, मान्यता ना, मोलही जीतें नमें
धूल वाटेची असे तीं क्षुद्रशी मी भूवरीं । २ ।
चूक नसतां प्राणनाथें ज्या जीवा लाथाडिलें ।
वंचिता ती प्रीति लोकीं, शापिता मी सुंदरी । ३ ।
दैवयोगें जींत नुरला अल्पसा झंकारही
गंजलेल्या त्या विणेची, मोडक शी तार मी । ४ ।
फूलसा ज्या लोचनांना वाटलों मी हे सखे!
शल्यसा त्यांनाच आतां बोचणारा त र मी ।।५।।
ज्यांत कांठोकांठ राहे वेदनारूपी जळ ।
थोर सिन्धूचा असे त्या मध्यभागीं मीन मी । ६ ।
भंगलेल्या भावनांची मी असे कादंबरी
ज्यांतुनी मूर्ती न निघणें त्या शिळांची रास मी । ७ ।
दिव्य रत्नें वैभवानें शोभणारा जो घट ।
भंगलेल्या त्या घटाचीं सानशी मी खापरी । ८ ।
लाख सोशी जन्म मृत्यू प्रीतिगाना गावया
प्रेम वेडा बोलती तो मीच वेडा भूवरीं । ९ ।

**डॉ शं. जा पुरवार**
(कृष्णमित्र)

# सत्वीस

प्यावी कशीं आग ठावी तुला ना –
नसे वेदनांशी तुझी ओळख ।
सांगू नको गीत गायास मातें–
न ठावा जरी आसवांचा मख ॥

१

तृष्णानला रोम रोमीं भरोनी ।
जिवें चातकें गीत गायीयलें ।
आहाळली कांपली सृष्टि सारी–
निशा तारकांनीं असू ढाळीलें ॥
ती वेदना जागते अंतराळीं –
तिनें प्राण–वीणेस झंकारिले
तारा तुटोनी दिशा कांपल्या अन् –
अिथें गीत माझें सखे जन्मलें ॥
प्यावी कशी आग ठावी न राणी–
नको गीत गाया धरूं आग्रहा ॥
लावण्य स्वर्गीय सारें झडोनी –
वसंतास हेमंत ग्रासील हा ॥

२

औदास्य नैराश्य गीती खळाळें–
नसे चंदनाची सुगंधी अुटी ॥
वैफल्य कारुण्य सालंकृता ती –
–तया भंगल्या भावनांची कुटी ॥

शृंगार छंदांतुनी आग खेळे–
जळे कामना शब्द शब्दांतुनी ।।
अब्धीं रसांचे अिथें शुष्क झाले–
झुरे अंतरीं व्याकुळा रागिणी ।।
प्यावी कशी आग ठावी तुला ना–
नको गीत गाया वदूं मानिनी ।।
ज्वाळा फुलांच्या – झळा सौरभांच्या–
उषा स्वप्न देतील पिंजारुनी ।।

३

स्वप्नें गळालीं, व्यथा अर्थ प्याली–
कथा ओघ मध्येंच ठेचाळला ।।
रक्तेंच न्हाली पहा अक्षरें अन्–
कथाभाग सारा मनीं गोठला ।।
प्रीतीस संजीवनी वेदना ही–
म्हणोनी जिणें सह्य झालें जनीं
मी आग प्यालों चिता पेटवीली–
--तरी आंसवें कां? तुझ्या लोचनीं
प्यावी कशी आग तूं तें कळालें–
अतां मीच गातों मुदें साजणी
अश्रू तुझें सांगता जीवनाची–
असे तप्त गीतास मंदाकिनी ।।

**डॉ. शं. जा. पुरवार**
('कृष्ण'मित्र)

# आटापिटा

केवढा हा आटापिटा
रस नाहीं काव्य नाहीं
अनर्थाला खुल्या वाटा
वृत्त नाहीं छंद नाहीं
बरळतो वटवटा !
ऱ्हस्व जातें दीर्घाकडें
दीर्घ घालीं हेलपाटा
भयभीत व्याकरण
कांपतसे लटलटा
आंधळ्याची अनुभूति
अभिव्यक्ति पिते घोटा
स्फूर्ति देवी बोटें मोडी
याच्या वर कट कटा!
प्रसादाचा प्रासादांत
क्लिष्टता ही काढी कांटा
काव्य शक्ति शिमग्याची
अर्थ सारा उफराटा

घाबरट बृहस्पति
शोभवितो व्यासपीठा
'बसा खालीं' अैकण्याचा
नाद याला फार भोठा
मसणांत पाठविल्या
अलंकार – शब्दछटा
सभा पाट्यावर घाशी
रंडा - गीत वरवंटा
नव्या जुन्या तंत्रांतून
धुंडाळितो चोर वाटा
ओळखिचे संपादक
प्रसिद्धिला नाहीं तोटा!
जाहिरात मोठी पण–
सपेशल माल खोटा
म्हातराच्या प्रसिद्धीला
विवाहाचा नटापटा !

○ ○ ○

—रा. लिं. मैंदरकर
(उस्मानाबाद)

# संकीर्तन

तुझ्या प्रेम संकीर्तनीं
भाव–विश्व झालें बद्ध
विरहाचा विश्वामित्र
तपो भंगा सदा सिद्ध
प्रश्नार्थक तुझीं वाक्यें
अर्थवाहीं विलक्षण
कुठें, कुठें करूं आतां
अवतरणाची खूण !
कंसांतल्या श्रृंगारांचें
अवखळ अुद्दीपन
अव्यक्तांचें शब्द–चित्र
काढूं कसें लेखणीनं
तुझी प्रणय – साधना
अगतिक डोईजड
परेतला मूढ – वाद
वैखरीला करी मूढ !
भाव तेथें देव अुभा
लौकिकांत अशी म्हण
अभावाच्या कारणांत
माझा भाव चिरंतन !

– रा. लिं मेंदरकर

# भैरवी ही छेडली

शेवटीं या मैफिलीच्या भैरवी ही छेडली ।। धृ ।।
मुग्ध कांहीं हांसरे ही ताटवे जे थाटले
मोहवीती मानसातें सौरभानें दाटलें
बोंचती कांटे तरी हीं जेथ पुष्पें तोडलीं ।। १ ।।

तापलेले ते अुन्हाळे पावसाळे पाहिले
जीवनीं केव्हां शिराळें धुंद होतें राहिलें
कैफ होता संपला तो काहिली अन् वाढली ।। २ ।।

स्वप्नशा गेल्या निघोनी रंगल्या रात्री किती
लोचनीं सुस्तावण्या या जागली ज्यांची स्मृती
रात केव्हां जागुनीया अेकट्यानें काढली ।।३।।

प्रीतिनें ओथंबलेली अमृताची पूर्णिमा
सुंदशी अंधारलेली पाहिली तैसी अमा
साहिलें ही सोबत्यांनीं साथ जेव्हां सोडली ।। ४ ।।

रात्र गेली ओसरूनी दीप ही मंदावले
भावनांचे सूर सारे लोचनी सामावले
अुन्मनीची अन् समाधीं मीच माझी मोडली ।।५।।

ग्रंथालय, ठाणे. स्थलप्रत.

— बा. ग हरसूलकर

अनुक्रम ३५३५१
दिनांक १७-८-७३

# रुबाया

काळोख अंतरीं सुन्न झोपडी बसली
परि तिरिप उन्हाची तिजला उजळित घुसली
हतभागि जिवाची गमली जणु सुखरेषा
उमटून क्षणभरीं कायमची जी पुसली १.

X X X

दडतांच उन्हें तीं हळूंच क्षितीजावरूनी
छायेंत निशेच्या उदास गमते अवनी
हें तसेंच यौवन ढळूनि जरा ती येतां
जीवनीं रितेंपण उरतें, स्वप्नें विरुनी २

X X X

तव शांत सुनिर्मल नयनांच्या कासारीं
प्रतिबिंबित होतीं जीवन-स्वप्नें सारीं
गतकाल होतसे सपूर्त येथें ऐसा
माधूरी जयाच्या सुख दु:खाची न्यारी ३

X X X

ही प्रीत व्यापिते हृदयाच्या गाभारा
मानवे न हिजला उच्चारांचा वारा
परि लाजरीस या उधाण येतें जेंव्हां
नि:शब्द प्रकटते दो नयनांच्या द्वारां ४

X X X

दु:खानें भरलें जीवन काठोकांठ
वैफल्य निराशा नित्य पुरविती पाठ
जग बघुनि असें हें नभ हि वाकलें भिउनी
हें सर्व उपेक्षुन अम्ही चालतों ताठ ५

- बा. ग. हरसूळकर

# पिठी

दूर टिटवीची साद
वाऱ्या मनीं भरी कांटा
होते पुळणी मनाची
हुरड्यास येती लाटा
क्षितीजाशी पाणरेघ
निळी पाऱ्याची हालते
कुंकुमाचें सूर्यबिंब
त्यांत भिजतें विरतें
संथ लाटांत पायांशीं
तेंच बिंब तरंगते
रितें जन्म सांधणारें
स्वप्न त्यांत उमलतें
हातीं हात गुंफोनिया
उभे आपण पुलिनीं
तळीं सरकते वाळू
मूक लाटांच्या ओढीनीं
अर्ध्या मिटल्या डोळ्यांत
फुलतात नभें सात
जातो जग ओलांडून
अैका माडाच्या डोलांत

तुझ्या गुंफिल्या बोटांचे
सळ उठले वाऱ्यांत
गीत माझें थरकतें
ओल्या रेतीच्या ओठांत
चोंच रोवून रेतीत
साद टिटवी घालिते
आज वेदना त्यांतली
स्तब्ध क्षितिजें कोरिते
लाट पुसे सागरास
फुटतांना फेन खुळी
वेढुनीही पृथ्वी, कां रे
मिठी रितीच राहिली

- वा. रा कांत



# चकमक झडली आहे.

मातीच्या मनांत चकमक झडली आहे
आज अंधाराच्या महाखंडांत ऐक ज्योत जागली आहे
त्या शलाकेत
सर्पमण्यांचे खुनशी तेज फुत्कारतें
सिंहाच्या डोळ्यांतील मृत्यूचें टेंबे लखलखतात
पण वाऱ्या–थांब
असा रौरवत वाहूं नकोस
कदाचित या ज्योतीच्या वेताळ्याच्या दिवट्या होतील
वणवे पेटतील सांबराच्या शिंगांतून
वाऱ्या थांब
चकमक झडली आहे मातीच्या मनांत
विषुववृत्ताच्या कुशीत
सूर्याच्या वीर्यानें हा देश जन्मला आहे
काळ्या जंगलापलीकडील शतकांच्या धुक्यांत वांकून
कोण वाचीत आहे
गूढ भीषण पिरॅमिड्सचीं तिरकस दगडी बाराखडी
रुद्ध श्वासाचा नि वाहत्या रक्ताचा अर्थ लावीत
कोण बसलें आहे.
'स्फींक्स च्या' पापणीहीन डोळ्यांत ?
साखळदंडांनीं ओढीत नेलेल्या गुलामांच्या
वाळूवरील पदचिन्हांना

प्रतिकाराची ?य सापडली आहे काय ?
वांझ वाळवंटांतील रेती गर्भवती झालीं आहे
घनदाट अरण्यांत पेटलेल्या कट्टांहों भोंवतीं
मस्तींत नाचत आहेत
अर्ध नग्न काळीं शिसवी अंगें
यौवनाचे काळें संगमर्मरी कडे
पावसाळ्या रात्रींतील आषाढघनांचीं काजळीं स्वप्नें
गवती घागरा गिरगिरतो आहे
क्षितीजाचा ढोल घुमतो आहे
त्यांच्या शंखांच्या कुंडलांत सागराची गाझ आहे
पोवळ्यांच्या माळांल सांडलेलें सूर्याचें ओज आहे
आणि त्या कटोहाला फुटला आहे माणसाचा डोळा–
काळ्या पांढऱ्या कवडीसारखा – पाण्यानें भरलेला
चकमक झडली आहे मातीच्या मनांत
महंमदाचा उंट तरवारीचीं पानें चावीत इथें आला
त्यांच्या पाठीवरून उडालेलीं कुराणाचीं पानें
सागाच्या अरण्यानें खाऊन टाकलीं
ख्रिस्ताचे कोंकरुही इथे चरत आलें
तागडी तरवारीच्या भांडणांतूत क्रूस विसरून गेलें
गंगेचे हात आणि हिमालयाची साउली घेऊन
अेक हाडकुला माणूस आला
आणि इथल्या मातींत त्यानें प्रथम ज्योत उजळली

सत्याची शांत ज्योत–सत्याग्रही
( तप्त वाहत्या वाळवंटाचा जाळ हिमालयाच्या–
मनांत उमटला )
गंगा यमुनेच्या तीरावर
दक्षिण सागराच्या कांठावर
तोच प्रकाश पसरला आहे
चकमक झडली आहे मातीच्या मनांत
सात समुद्रांच्या पलिकडे
आयनेदार अिस्पाती शब्दांच्या गगनभेदी महालांत
वाग्जल्पितांचे भुईनळे उडविणाऱ्या आतषबाज
मेळियांनो
या मातीकडे पहा–
वाशिंग्टननें उपसलेल्या स्वातंत्र्य खड्गाचें पाणी
या इथें पणास लागणार आहे
लिंकनची समतेची शपथ
या कांगोच्या कांठावर पूर्ण व्हायची आहे
महात्माजीची जखमी सायं प्रार्थना
प्राणांहून मोठी होऊन
याच मातींतून सूर्यमंडळाचा भेद करणार आहे
चकमक झडली आहे मातीच्या मनांत

– *वा. रा. कांत*

# गच्च रात्रीच्या कुशींत

गच्च रात्रीच्या कुशींत
शिरें विजलीचें पातें
रौरवतां रक्त तुटे
वेड्या आकांताचें नातें
रंध्रोरंध्रीं खिळेठोक
तनुमनाची चाळण
छिद्राछिद्रांतून परी
बिंदुबिंदूचें पाळण
हवा जखमेला आतां
ओल्या रक्ताचा गिलावा
देठासाठीं प्राजक्ताचा
पाकळीचा प्राण घ्यावा
डोळा अेक अश्रु, तोही—
पापणीनें कातरिला
आहे एक जन्म त्याचा –
सौदा होऊन चुकला
पाणी पिळून गळून
नभीं लक्तरांच्या राशीं
वाळण्याचें सूख फक्त
आतां उशापायथ्याशी

*यशवंत कानिटकर*

# ठसे

आहे कालच्या ठशांत
आज सांचलेलें पाणी
पहा डोकावून त्यांत
नरदेहाची निशाणी

नको खंत करूं बाबा
जरी झडलें हें पृछ
पृच्छ कांहीं फार नव्हे
चार केसांचाच गुच्छ

कुर्वाळितां गंडस्थळ
खूण रुपे न शिंगांची
तुझ्या सांवलीनें काळी
कांच पाण्याच्या भिंगाची

चाले अरी, पडतसे
नीट टाक्यापुढें टाका.
धांवें शिवण पुढतीं
मागें कातडीच्या हांका

असें उमटतां ठसे
पुढे टांच मागे बोटें
आहे भविष्य नाकाशीं
तरी मार्गीं भूत भेटे

*- यशवंत कानिटकर*

# श्रावणमास

नटला श्रावण मास
हास्य मिषें नव वधुच्या गालीं पुलकित हो उल्हास
सुभगसाज लेवुनी बहुविधा
शाद्वल वसनालंकृत वसुधा
श्रावणागमीं सौंदर्याची रचितें नव आरास ॥१॥

शांत स्निग्ध परि नच उच्छृंखल
मुग्ध नवोढेचा जणुं अंचल
जणुं श्रावण घे हरित पल्वलांतुनी हिचा अदमास ॥२॥

याचा तरल स्पर्श सुखदसा
नवथर स्नेहल नितनूतनसा
नव परिणित युगलास मीलनीं स्वर्ग सुखाचा भास ॥३॥

मीलन विरहामधली अस्फुट
सीमा रेषा बनता उत्कट
—विरहार्तांना होई सुखदसा रम्य मीलनाभास ॥४॥

रचिती कैक युवा ज्या उपवर
स्वप्न उद्याचें अबोध सुंदर
स्वप्नांचा त्या लयनिबद्ध अन् मोहक पदविन्यास ॥५॥

—राम पिंगळीकर

# हुरहूर

कुणा मी सांगु कसें काहूर
व्यथा-विवळते विकलतेंतुनी आणि तशी हूरहूर ।।ध्रु।।
'शील' शब्द हा कोषीं न मिळे
यौवन मदिरा चषक उफाळे
प्रतिक्षणीं ये कामुकतेला ओसंडूनिया पूर ।।१।।
प्रसाधनें अन् रंग रोगणें
वदनीं स्मित हास्याचें लेणें
अभिसारास्तव उसना घ्यावा तिलोत्तमेचा नूर ।।२।।
वखवखलेल्या पुरुषी नजरा
शांत विखार वा तप्त निखारा
आंतुन जळतें शरीर मन हें जळे जसा कापूर ।।३।।
जीवनास या किटलें विटलें
दुष्ट वर्तुळीं या गुरफटलें
अगतिकतेच्या कर्दमांत अन् रुतले हे नूपूर ।।४।।
कीचक दुःशासन हि पाहिले
गौतम बनुनी इन्द्र हि आलें
माझ्या मधली शप्त अहिल्या चरण स्पर्शातूर ।।५।।
कलंकितेची ही निश्वसितें
शोक गीत त्यांतुनी जन्मते
निकट कालचे गेलें सोडून आज कुठें तरि दूर ।।६।।

-राम पिंगळीकर


# गृहिणी आणि पाकशास्त्र

पाकशास्त्र हा अमोल ग्रंथ
कुणी गृहिणी करी प्रकाशित
समस्त वर्णिल्या होत्या त्यांत
पाक क्रिया त्या हजार त्यांत

तिला न जमली कधी तयांतिल
एक क्रियाहि प्रत्यक्षांत
दहिवडे आणि श्रीखंड राहुं द्या
मुळीं न जमलें पिठले भात

पती वाचितो मिटक्या मारित
ग्रंथांतिल त्या पदार्थ वर्णन
क्षुधा आपुली शमवी पण तो
खानावळीचा डब्बा आणवून

— गोपाळ वांगीकर; परभणी



# खुर्ची

गोड तुझा सहवास । सखे ग ।
गोड तुझा सहवास ।। धृ ।।
तख्त ताजहि तुच्छ तुझ्याहुन
इंद्रासन कैलास ।
तव अंकावर मुक्त लोळून
मवाळ केलें राजकारण
देशभक्तिचा फार्स करून
चढलों अुच्च पदास ।। १ ।।
तव स्पर्शानें पूनित झाले
वाल्याचे ते वाल्मिक ठरले
संत्र्याचेहि मंत्री बनले
भाव आला भलत्यास ।।२।।
तपोवनांना भुरळ पाडिशी
लुंगीवाल्याला भुलविशी
भल्या भल्यांना नादिं लाविशी
साधू सन्याश्यास ।। २ ।।
आरूढ होता तव अंकावर
स्त्रैण शिखंडी बनतो शूर
अहिंसकासहि येई जोर
गोळीबार करण्यास ।।३।।

मराठी ग्रंथ ... स्थालय
अनुक्रम ३५३१८ वि
क्रमांक ........................ नों. दि.

कधीं मारिली ज्यांनीं न माशी
तयांनाच तूं मिठी मारिशी
क्रांतिवीरांना देशी फांशी
आणिक कारावास ॥ ४ ॥

विभक्त करितां कुणि तुजपासून
भक्तिभावें तुलाच चिकटुन
मार्कंडेयासम कवटाळून
बसती तव पिंडास ॥ ५ ॥

लपवूनी आपुले महान दुर्गुण
जो तो देई तुलाच दूषण
सत्तालोलुप ह्या मानव गुण
दोष अुगी अन्यास ॥ ६ ॥

लोकसभा वा असो विधान
तुझेंच चालें तेथ भांडण
जो तो टपला चंग बांधून
तुलाच गे वरण्यास ॥ ७ ॥

तुझ्या संग्रहीं शोषक मत्कुण
म्हणुन भंगती त्या स्पर्शानें
थोर तपस्वी हिऱ्यासमान
शिवतां तव अंगास ॥ ८ ॥

— गोपाळ वांगीकर; परभणी

# करमणूक

धुरकटलेल्या संध्याकाळीं
पारावरती
दगड जयाचे निखळुन गेले
होतें तेथें थोडें
गवत वाळलेलें,

बसला होता कुणि म्हातारा
केंस जयाचें पिकून गेले
होता जुळवित
जुन्या स्मृतींचे हिरवे धागे
गत काळांमधि विखुरलेले.

— गोपाळ काळे

# कवितेचा पाठ देतां

दाढी मिशा वाढलेल्या  कोट फाटका अंगांत
हातीं धोतराचा सोगा  जीर्ण वहाण पायांत
पोट पाठीस लागलें  हाडें गालांचीं तींवर
थर थर कांपे स्वारी  श्वासें दाटलासे ऊर
घराकडे जातांनाही  पाय हळू हळू पडे
जसें भीतीनें माराच्या  पोर ठायी ठायीं अडे
हातांतल्या पिशवींत  पात कांद्याची इवली
सोंवळ्या साबूदाण्याशी  लाजे लाजे बिलगली
दांत काढोनिया फणी  चावा घेई आंकड्यांचा
हर्षभरें वेडा होई  खुळखुळा वात्सल्याचा
दोन इरकली खण  हळू बाहेर पाहती
पुढारल्या दुनियेस  तोंड दावण्या लाजती
पिशवींत नसलेली  गीता वदली मुखानं
'कर्मण्येवाधिकारस्ते  मा फलेषु कदाचन'
आज पगार मिळाला  आज पिशवी भरलीं
आणि भरली म्हणून  पुन्हा काळजी उरली

व्यक्ति कोण असेल ही
कल्पना ती करा बरी
कवितेचा पाठ देतां
मुलां शिक्षक विचारी

— गोपाळ काळे

# उपकार

रेशमी कुरळचा स्वरांत चांदण्यानें
चिंब न्हालों, तृप्तही आकंठ झालों
केवढे उपकार झाले हे तुझे, कीं
मी स्वरांचीं स्वर्गसौख्यें पावलों !

नादब्रह्माचा पिसा यात्रेकरू मी
वाहतों आतुर श्रुतींच्या कावडी या
गे तुझ्या सुरमोहिनीला मोहुनी
ब्रह्महि धांवेल आलिंगावया !

हें उषेचें उमलतें लावण्य तूझ्या
'तोडि' ने माझ्या मनीं आरक्त झालें
आणि ठुमरीनें तुझ्या शृंगारकन्ये,
रक्तिम्याला सोनियाचें हास्य आलें!

अन् ! इथें तूं थांब थोडी; मन्मनीं-
भावनांची वीण गे ताणूं नको
सांजचें काहूर 'सोनी' गाऊनी
आण गीतांची तुला आणूं नको! !

- राम शेवाळकर

# स्वयें गोदावरी आली

आहे नीट ध्यानांत, कीं
हीच गोदाओ माउली
मागें कोणा गौतमाची
पापें प्रक्षाळून गेली !

हिच्या प्रेमभेटीसाठीं
प्रभु रामचंद्र आले
वर्षें चतुर्दश हिच्या
मायापाशरांत न्हाले

ज्ञानदेव एकनाथ
रामदास, जनाबाई
हिच्या पुण्यप्रदेशांत
ह्यांना जन्मायाची घाओ !

नाहीं कधीच मी केलें
हिच्या पात्रामध्यें स्नान
नाहीं भक्तिभावनेनें
हिचें घेतलें दर्शन !

तरी नवल ! आजला
उरीं घेऊन असोशी
स्वयें गोदावरी आली
माझ्या हट्टी पायापाशीं !!

— राम शेवाळकर.

# खुणा

दिव्याच्या लख्ख किरणांनीं
काळोख धुऊन निघतो
वाटेवरतीं खुणा उगवतात
श्वासांनीं पेरलेल्या !

ध्वनींना कोंभ फुटतात
शब्दांच्या तारेंतून
कुठें कळत न कळत सूर गळतो
अशा कोवळ्या पानांतून

साऊल्यांत जुळतात शत
स्पर्शाच्या फुला कळ्यांनीं
गंधांच्या ओळी झरतात
ओठांच्या ओंजळीतून !

बिलगतात नवीं पानें
वाऱ्यांच्या झुळकीनें.
कुठे हुकतात चुकतात खुणा.
तुझ्या नव्या ओळखीतून

— गजमल माळी

# मोजीत पाकळ्या उभा

पिंपळाखालीं हिवाळी रात कुसुम कोमल शत
अंधुक सावल्या भिजल्या दवांत मोकळ्या बसल्या गात

दरडीवरीं बकरी पुढें झाडांच्या तशाच रांगा
पानांत घुमे चावरा वारा झोंबित कोवळ्या अंगा

अस्पष्ट ध्वनि आवाज कुणी करीत गेले दूर
तसेच वाजलें पाऊल विरले, विरले संगित सूर

शोधीत अिथें गळाले शब्द झेलीत नि:शब्द उभा
कुसुम कोमल शतांत काळ्या, मोजीत पाकळ्या उभा

— गजमल माळी

१३४६८

# पथदीप

झरणारे छायेचे अवनीवर सूर असे
वृक्षांनीं धरिलेलें मौनाचें वलय तसें
संपवून गगनाची यात्रा खग थकलेले
कोटरांत शब्दांना सांकडेंच पडलेलें ।

रंग विटे गंध फिटे, सुमनें तर सुकलेली
तकतकीत पानांची कधिच कळी मिटलेली
सुकलेल्या गवतांतून थयय थंड स्पर्श फिरे
झुडुपांचें आर्तगीत किरकिरतें एक सुरें

पाचोळा पानांना दावितसें भय पांढुर
डोहाची भेदरली नजर थिजे कांठावर
मंतरल्या माळावर पायवाट चुकलेली
मात्र काजव्यास एक व्यथा तिची कळलेली !

सौ. सुहासिनी इर्लेकर

# आला पंचमीचा सण

आला पंचमीचा सण । ओल्या मेंदीच्या पायांनीं
चुडचा भरल्या हातांनीं !
उंच उंच झाडांवर । झोके झुलती झोकांत
फांदी वाकते तालांत !
गेल्या सासुरवाशिणी । आल्या लेकी माहेराला
तीर्थरूप प्रयागाला
एक सासुरवाशिण । सून वळे फुलवात
दृष्टी चोरटी दारांत ।
येते गाडी जाते गाडी । गाडी दारांत थांबेना ।
कुणी बोलवा धाडीना ।
गेल्या सख्या शेजारिणी । गेल्या जावा माहेराला
रूप येईना वातीला ।
थेंब थेंब आसवांत । चिंब वात भिजलेली
सहाणही पाझरली ।
लाव देवापुढें दिवा । सांज झाली सूनबाई ।
सांगतात सासूबाई ।
लखलखला देव्हारा । आली भुलई रंगांत
चुरचुरे फुलवात ।
गेला पंचमीचा सण मेंदी रंगल्यावाचून
चुडे भरल्यावाचून

**सौ. सुहासिनी इर्लेकर**

# वर्षा

वर्षा आली वर्षा आली
ऊन लागुनी व्याकुळलेल्या
तप्तधरेची तृषा निमाली ।।
मेघ पसरले नभीं चहुंकडे
आणि चकाकत वीज कडकडे
वरुण देवता जणुं सृष्टीवर
निज प्रेमाची पाखर घाली ।वर्षा।

जलमातीचें घडतां मीलन
शीघ्र जाहलें बीजारोपण
तृणांकुरांची मोहक हिरवी
नव वस्त्रे वनदेवी ल्याली ।।वर्षा ।।

रानों रानीं वनीं उपवनीं
धुंद जाहले भ्रमर गुंजनीं
मधमाशा मध प्राशुनि लपल्या
पुष्प लतांच्या पानाखालीं ।।वर्षा ।।

विविध फलांच्या वृक्षावरतीं
रान पाखरें कुजबुज करिती
त्यांचा एकच ध्वनी निनादे
वर्षा आली वर्षा आली ।। वर्षा।।

नद्या सरोवर तुडुंब भरलें
नव आशा नव जीवन फुललें
नव जोमानें शेतकऱ्यांना
कर्तव्याची पहाट झाली ।। वर्षा ।।

वर्षित हर्षा अशीच वर्षा
नियमित येवो वर्षा वर्षा
धन धान्यानें भारत वर्षा
करो अखंडित वैभवशाली ।।वर्षा ।।

—वसंत अं. तुळजापुरकर
( राज्य कवि )
हैद्राबाद ( आंध्र )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वाक्षरी.
अनुक्रम 35.39८ दि: ...
...



# मायबोली मराठीच

कोऱ्या मनावर ओवी
ज्ञानदेवांनी लिहावी
नाम देवांच्या बोलाची
वाटी ओठास लावावी

जीवनाच्या जात्यावर
घडो जनाईचा संग
भाववाहिनींत तरो
तुकारामाचे अभंग

भारुडीं नि भागवतीं
घाट माझ्या गंगेवर
समर्थांचें आवाहन
आत्माराम ऐकणार

घुमो आतां मंडपांत
गद्य पद्याचा मृदंग
करीं भावार्थाचें टाळ
भरो भजनांत रंग

हृदयाच्या देव्हाऱ्यांत
माय बोली मराठीच
बोबड्या या बोलांनींही
पूजा करावी तिचीच !

*शं. श्री वाशीकर*

श्रमणाऱ्या हातांनो
मजसाठीं घरकुल हें,
तुम्हींच कीं उभवियलें !
वेलीला वाढण्यास
मांडव जणुं करुन दिले !
आणि याच घरकुलांत
चिमणें जग पोशियलें !
देहाच्या लाजेची
द्रौपदीच्या कृष्णासम
हाक तुम्ही ऐकियली
वसनें ही पुरवियली !
रूप संपदेस या
सखी मानुनि सजवियलें !

श्रमणाऱ्या हातांनो !
भूक मला लागतांच
अन्नपूर्णे परी
तुम्हींच मज भरवियलें !
संचरण्या मज जगतीं
तुमचीच वाट ! वाहनही तुमचेंच !

वाटाडे हि तुम्ही !
तुमच्याविन माझें ना
पाउलही पुढतीं पडे !
मी पंगु ! मजकडुनी
परि तुम्ही पर्वत उल्लंघविले !
फिर फिरुनी थकल्यावर
श्रम तुमचें मम विश्राम !
मजसाठी तुम्ही केलें
जग हें आनंदाश्रम !
विश्वकर्माच तुम्हीं जगीं अवतरलेले !

श्रमणाऱ्या हातानों !
माझे जें सुंदरसें
स्वप्न कल्पनेंतलें
सत्य तुम्ही तें केलें !
आणि शिव सुंदर जें
मजला क्षण जाणवलें
त्यास तुम्हीं मजपुढतीं
मूर्त रूप दिधलेलें !

श्रमणाऱ्या हातांनो !

माझा जणुं नित्य नवा
भाग्य लेख लिहणारे
चित्रगुप्तही तुम्ही !
जीवनास माझीं या -
मृत्युंजय करणारी
संजीवनीच तुम्ही !
रात्रंदिन लढतों त्या
युद्धाचे सेनानी !

श्रमणाऱ्या हातांनो !

श्रमिकांच्या देवा रे
लाख वरदान, दे वा न दे !
श्रमणारे दोन परी
माझें मज हात दे !
माझे मज हात दे !

- शं. श्री. वाशीकर
उस्मानाबाद

# भाऊबीज

आली आज भाऊबीज
तुझी ताई वाट पाहे
तिच्या हृदयाची हांक
तुज ऐकूं येत आहे ॥१॥

नको बावरा होऊंस
लाग आतां तयारीला
तुझी ताई वाट पाहे
भाऊ आला कां अपला ॥२॥

वठलेल्या तरुंपरी
तुझें जीवन नाहीं रे
उगमाच्या जागीं सदा
वहातात छोटे झरे ॥३॥

तेथें सजीवपणानें
सदा धांवत रहावें
प्रेम आणि त्यागासंगें
दुजें आपलें करावें ॥४॥

झरे येतील आणिक
मिसळतील तुझ्यांत
थोर जीवनाचा झरा
होवो त्यांच्या संगतींत ॥५॥

आज जरी लहान तूं
नको दुखः मानू मनीं
कृपा देवाची होईल
आळवितां चक्रपाणी ॥६॥

उतावीळ होऊनी ये
येई वेगे भाऊराया
तुझा शीण घालवीन
न्हाऊं प्रेमे घालुनिया ॥७॥

रंगितशा पाटापुढें
काढीन मी रंगवल्ली
हाडावरी मांस चढो
तेल लावीन त्या वेळीं ॥८॥

तुला उटणें लावून
प्रेम अंघोळ घालीन
तुझ्या आवडीचें आज
करूं आपण भोजन ॥९॥

गूज गोष्टी करूं थोडचा
सुख दु:ख बोलूं कांहीं
तुंबलेल्या विचारांना
मोकळेंसे करूं भाई ।१०।

भक्तिच्या या तबकांत
प्रेमाचा हा दीप जळें
अशा दीपाच्या प्रकाशें
जीवन हें ही उजळें ॥११॥

लावूनिया कुंकू भाळी
अक्षद हो वहातांना
तुज आशीर्वाद देतें
नेई शिदोरी जातांना ॥१२।

तुझ्या शांत स्वभावानें
चंद्राला रे लाजविसी
तुझ्या गंभीरपणानें
सागराला धडा देसी ॥१३।

संसारांत कटूतेचें
वीष पचविसी देहीं
तुज अमृत पाहीले
मातेनें रे कोण्याठाई ॥१४॥

मज ओवाळणी देई
देई रुपेरी नाण्याची
टाक सुपारी तबकीं
किंवा पुडी कुंकवाची ॥१५॥

होशील तूं पैसेवाला
तेव्हां तुजला कळेल
प्रेमाने जें दिधलें तें
तुझ्या ताईला पावलं ॥१६॥

सौ. प्रमिलाताई भालेराव

# दिशा

आज तमव्याप्त दिशा
सौधावरून पळते जग दिसणार नाहीं
हिरव्या तरुराजीची साडी नेसून
साकारणार नाहीं नाचणारें वारें
आकारणार नाहीं प्रीतीमधली व्याकुळता
व्यथेत रंग भरणार नाहीं
दिसणार नाहींत तुझ्या ······
आज तमव्याप्त दिशा

आज तमव्याप्त दिशा
कुस्करूं कां शरीर काल तापलेलें
स्मृतींत आवेग उरला नाहीं आज
कशाला वाजंत्र्या प्रेताच्या यात्रेस
जरीकांठी कफन .... आभासाला
उरला नाहीं आधार
उपडा झाला आहे आकाशद्रोण
विस्कटलेल्या केशजालांतून
कसें बंधू तुज सुकल्या नेत्रांनीं
त्यांना हीं तर चढलीं आहे ··· सख्या
आज तमव्याप्त दिशा

— शिवाजी गऊळकर

# गूढ

गवसलें नाहीं न गवसणारें एक गूढ
सायंक्षितिजाला नितळ चिकटली शिळा
समसम विसरल्या
मोकळ्या विस्तीर्ण विश्वांत बंदिवान
शिळेच्या मागील हवय् मला
भटकून जीव थकणार रुळल्या मार्गावर
अंधारांतून अंधाराकडे जावयाची येथली रीत
कधींच नाहीं गवसणार तें गवसणारें—
सायंक्षितिजाला नितळ चिकटली शीळा

*- शिवाजी गळ्ळकर*

# राधा

मोहरलें मी मोहरलें
मदनरसानें भरलें हो !
    मन हुरहुरलें
    वनवन फिरलें
नयनदळें भिरभिरलें हो !
    सुस्वर श्रवलें
    अंतर द्रवलें
हरिनें हें मन हरिलें हो !
    तन मुसमुसलें
    मानस हंसलें
वदनीं हास्य विलसलें हो !
    पद्म उमललें
    मधुकर रमले
मधुकण कणकण स्रवले हो !
    वसन विसरलें
    कुच कुस्करले
हरिनें गूण उधळले हो !
    रज संचरलें
    शरिर शहारलें
आलिंगनिं शिरशिरलें हो !

स्वप्न वितळलें
नयन नितळले
मी पण अन् मम गळलें हो !
परपुरुषीं रत
स्वप्निहि अनुचित
परि मी सुकृत केलें हो !
हलाहलांतून
मर्त्य कुलांतुन
पापिण परि मी तरलें हो !
हरिनें मज आकळिलें हो !!

— त्र्यंबक वसेकर

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ....... वि: .......
क्रमांक ....................... नों. दि. .......

# घार

उंच उंच उंच शिरीं
वटवृक्षावरी घरटे
कांटेरी तृणपर्णी
उच्चपदीं वावरते
  उंच उंच शिखरांतुन
  चिर चिर चिर चित्कारत
  सरसरूनी घार वरीं
  व्योमांतून भिरभिरते
पृथ्वीच्या परिघावर
विश्वासाच्या पोकळींत
पंख स्थिर पसरुनिया
नभ मंडळीं टेहळते
  अडवळणीं पडलेलें
  कैक दिवस पसरलेलें
  मूषक, मार्जार तसें
  श्वान, भुजग मेलेले
टेहळीत गति बदलित
झडपुनि वसुधेवरची
मृत शरिरें धरुनि उरीं
वर उडते वृक्षशिरीं

त्या आपुल्या झाडावरीं
उंच वडाच्या शिखरीं
कांटेरी घरट्यामधिं
आनंदें कुरतडते
वर चढण्या मन मरते
मेलेल्यावर मरते
मेल्यांना वरबडून
वर चढण्या मरमरते

कांटेरी घरट्यामधिं
वृद्ध वडाच्या शिखरीं
फडफडते तडफडते
त्यांतच पण मन जडते
या मनींची धार मनीं
गरगरते चिरचिरते
हलकट मन त्यांतच पण
त्यांतच पण अन् दडतें !

— त्र्यंबक वसेकर

# पांथस्थ

खुणा संपलेल्या नभाच्या प्रवासा
पांथस्थ होतांच मार्गा क्रमी
तितिक्षेंत पेटें पाऊल वेडें
जरी पंगु झाले डोळे तमीं

छळाया अुरा विश्व निर्वातरूपी
अुमाळे व्यथा खोल हृत्स्पंदनीं
झालींत गात्रें रात्रींत माती
तमोव्याप्त कोमेजली चांदणी

अनिश्चताचा काळोख ग्रासे ..
विद्ध स्वरांना नष्ट आहे.नभ
आतां फुलोरा गंधार्थ स्वप्नीं
फुलवा पुन्हा ऱ्हस्व; हें दुर्लभ

मुक्या पैंजणांचीं मूळाक्षरें हीं
सदा स्तब्ध शिल्पामध्यें जोंवरीं–
कंठातें कल्लोळ हो सांत्वनाचा...
स्थिरावें न छिन्नी ओठावरीं –

–तिचे पंख झेपावती विजेनें
मेघार्द्र व्योमांतल्या कंपना
लकाकून अंतस्थ पुनर्जन्म देती
सर्वत्र व्याकूळलेल्या मना !

– रविंद्र बोरगांवकर

# लिलांव

श्वास होओीना प्राणानें
क्षीण होईन आकाश
देंठ तुटून थांबतां –
गंध धरे न विकास

फूल विझूं दे गोरटें
तार जळूं दे भाबडीं
कळ तमाची सोसतों
छळ आम्हास आवडी

मन माझेंच पालथें
– तुझी तुडुंब तिजोरी
वेड्या भावनेची भीक
कुठे देशील मुजोरी ?

मांड तुझाच लिलांव
आज अुदार रहाटीं
करूं त्रिवार पुकार
दोन अुष्ण थेंबांसाठीं !

– रविंद्र बोरगांवकर

# अलीकडे पलीकडे

अलीकडे पलीकडे
माझ्या मनाचे पापुद्रे
मधें जगाचें संगर
आणि हवेंतील वाडे
लवचिक तटबंदी
साता अस्मानी फांकते
किंवा पाहुनिया रुंदी
लाजे सुईचेंही नेढें
गरूडाची भरभराटी
अहो! यांतच सामावे
वेग निःशब्द बाणांचा
तैसे धावती सरडे !
साडे तीन शहाणेही
येथें कित्येक नांदती
किंवा इस्पितळांतील
आणि बाहेरील वेडे !
जुन्या बुर्सट कल्पना
थरांथरांनी सांचती
पोखतात त्यांचें वरी
माझ्या नवतेचीं झाडें

लाख वर्षे हीं मेलेले
जगतात येथें लोक
तैसे चालतें बोलतें
जगतीही येथें मढें
फुगतात सुजतात
येथें पैसेवाली पोटें

– मधु कुरूंदकर



# एक उललेली शेंग

एक उललेली शेंग
नाहीं हेरली रे तुझी
छातीमध्यें अडकला
तोच जुनाट बेडका
त्राण नुरें शिणण्याचें
सहस्पंदनाची धांप
कशी सोसवावी मला ?

फुप्फुसाच्या जाळींतून
दाणा निखळून गेला
पुढें पुढचें पाहीन
आतां कुजण्याच्या आधीं
कोंभ फुटुं दे दाण्याला

- घनःश्याम जोशी

# तूं स्वप्न एक

तूं स्वप्न एक
जें दिठींत माझ्या असुनी
मिठींत नाहीं हंसलें ...
सांपडलें ...
मोहच भुरळ सचेतन
दार एक मिटलेलें
ज्या आडुन गीत उसळलें
वेदनेंत भिजलेलें—
तूं साद लाघवी
उरांत शिरली, रुजली,
जी आली कधीं न कानीं
तूं रीत मनाची माझ्या
जी कधीं न पुरती कळली
अन् नकळत जी आवडली
आपुल्याच ज्वालीं जळली
जी धगींत उजळत हंसलीं
तूं जळती लंका ...
मी शिल्प जागतें
जें अविरत न्याहळित हंसलें
नच पुढतीं सरलें ...

— नरहर कुरुंदकर

# तुज संबोधन कसे करावे

तुज संबोधन कसें करावे
अविकारी तव अनंत नाम
अधिकरणाचा शोध कुठे ? तव–
शून्य हृदय जै परमं धाम

चराचराचा स्वामी म्हणतां
दिसे षष्ठिचा उलटा प्रत्यय
तुझी रंगते रक्त पंचमी
परि शांतींचा शाश्वत व्यत्यय

अनंत हस्ते संप्रदान तव
परमार्थी हो विषमही वाया
अगाध करणी पाहुन विस्मय
तव मायाची गमे तृतीया

फुटतें खापर या कर्माचे
धरिता भावे तुझे क्रियापद
अनिर्वचन तूं निर्गुण साक्षी
कर्ताराचे नकार ध्रुवपद

अष्ठविधाहि चुकें विभक्ति
भक्तिचाहि गळें विकार
उरें प्रयोगी केवल अव्यय
तव नामाचा जयजयकार
म्हणुन फुकाचें नाम घेऊनी
कुणी तुझें व्याकरण करावे
एक न लागे तरी ही अक्षर
रडत वांचुनी हंसत मरावे

— रा. स. देशपांडे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 35391 दि. 
क्रमांक ........................ नों. दि. 10-8-63

# खट्याळ ओढा

ठिसूळ दरडीच्या कमरेला
खट्याळ ओढा घाली वळसा
कांठावरच्या उभ्या वडाच्या
उगा मनाला मिळे दिलासा.

जळफळली जरि पिंगट पुळणी
कढत मनांतुन वाफा सोडत
गार सांवली कांठावरची
फुंकर घाली अन् समजावत

हृदयीं जमतां गंहिवर ओला
लाजलाजली दरड सांवळी
चंचल ओढ्याला बिलगोनी
मनांपासुनी अन् विरघळली

खळखळ हंसला मिस्किल ओढा
खिन्न तृणांना हळु गोंजारित
शून्यपणें परि बसली पुळणी
मनांतलें कढ मनांत जिरवित

—श्रीकांत सदावर्ते

# असंख्य लाटा–

काळवीटाच्या काळजांतुनी
सांचू लागते जशी कस्तुरी
मनांमनांतुन तशीच माझ्या
ओसंडावी तृप्ती गहिरी
आषाढांतील वातावरणी
जसा फुलावा मोर पिसारा
तृप्त जाहल्या मनांत तैसा
अन् उमलावा स्वप्न फुलोरा
बोथट व्हावा त्याच क्षणीं मग
तव विरहाचा सलता कांटा
अन् परताव्या मनांस थडकून
तुझ्या स्मृतीच्या असंख्य लाटा –!

– श्रीकांत सदावर्ते

# धुंडित फिरतों माझें इप्सित

जे तरुतळीं
अन् गर्द रावलींत
हिरवळीवर
कधि ओघळलें
दंवबिंदूसम—
धुंडित फिरतों माझें इप्सित

नितळ चांदणी
जंव लुकलुकते
क्षितीजावरती
कातर कातर
मनांत हुरहुर
धुंडित फिरतों माझें इप्सित

निळ्या अंबरीं
जें विरघळलें
निळेंच होऊन
आणि वर्षतें
बनून चांदणें—
धुंडित फिरतों माझें इप्सित

घोर तमांतिल
एकांतांतुन
सळसळतें जें
मनां-मनांतुन
ओशट ओशट
धुंडित फिरतों माझें इप्सित

विसांवलें जे
ओठावरतीं
ओठाखालिच
गुलगुल किलबिल
दोन कबुतरें ...

धुंडित फिरतों माझें इप्सित
पापण्यांत जें सदैव तरळत

— तु. शं. कुळकर्णी

# मनांतले कढ

होते तुला जायचेंच मीहि नाहीं `अडविलें
मनांतले कढ सारे केव्हांचेच दडविलें...

पुनवेच्या चांदण्यांत शांत चित्तें विहरतां
अवचित आठवतो प्रणयाचा सर्व गाथा

तुझा एक एक चाळा तुझी एक एक कृति
मनामध्यें कोरलेली अजूनहि तशीच ती

व्यापिलेस जीवनास ह्याची नव्हती जाणीव
पदोपदीं आतां भासे तुझी सखये ! उणीव

आवरितों भाववारु तरि वेगें धांवतात
वेडी आशा हृदयास सफल होईल प्रीत

घडायचें नाहीं कधीं जाणतसें पुरेपूर
मोहोरतो काय कधीं पोळलेला तरुवर ?

जगायचें कसें तरी आठवणी घोळवित
अंतरांत लपवून तुझी जीवघेणी प्रीत

होते तुला जायचेंच मीहि नाहीं आडविलें
मनांतले कढ सारे केव्हांचेच दडविलें.

— तु शं कुळकर्णी

# असे कसे पुरुष !

असे कसे पुरुष बाई! कामापुरते गोड गोड!
ऑफिसमध्यें जाते वेळीं घाई रोजची ठरलेली
चष्मा कुठें ? पेन कुठें? शाई नाहीं भरलेली
धोब्याकडचा शर्ट काढला, बटण नेमकें तुटलेलें
बुटावरचें पॉलिश गेलें, मोजे सगळे फाटलेले
सायकलमध्यें हवा नाहीं आयत्या वेळेस येते जाग
शिस्तीवरतीं व्याख्यान झडतें पोरांवरतीं निघतो राग
पॉलिश करा, बटण लावा, पेनमध्यें भरा शाई
अर्धा स्वयंपाक टाकून उठतें त्याची काहींच पर्वा नाहीं
गबाळग्रंथी कारभार सारा, एक काम नाहीं धड
असे कसे पुरुष बाई कामापुरते गोड गोड! ॥१॥
रविवारचा दिवस म्हणजे, खास ह्यांच्या हक्काचा
मला मात्र सुट्टी नाहीं संताप होतो जीवाचा
चार मित्र घरीं येतात मग मला म्हणतात कसे!
'तुझ्या हातचा चहा म्हणजे स्वर्गामधलें अमृत जसें—
भजी किती खमंग होतात! उपमा नाहीं शिऱ्याला'
मीही भोळी हुरळून जाऊन, चटकन लागतें कामाला
गप्पा गोष्टीं, हास्य विनोद, अड्डा बसतो पत्त्यांचा
धूम्रपान अखंड चालू ढीग पडतो थोटकांचा !
रोजच्या कामांत आणखी भर, माझी होती ओढा ओढ
असे कसे पुरुष बाई! कामापुरते गोड गोड ॥२॥

साहेब बोलला मुकाट्यानें ऐकून घेतात, करतात काय
बायकोपुढें ज्वालामुखी, ऑफिसमध्यें गोगल गाय !
महिन्याकाठीं पैसे दिले कर्तव्याची सीमा झाली!
बाजार हाट, दुखणीं बाणीं, माझ्याकडें खातीं आलीं
"गृहमंत्री" पदवी मला उदारपणें करतात बहाल
आपण होतात "अर्थमंत्री" माझें मात्र पुरतें हाल!
आश्वासनें देण्यामध्यें भाऊ सख्खें मंत्र्यांचे
दर वेळेस नवी सबब एक नाहीं पाळायचे !
वेदवाक्य ठरून गेलें "संसार म्हणजें तडजोड"
असे कसे पुरुष बाई कामापुरते गोडगोड ॥३॥
असा कसा पुरुष स्वभाव कोणत्या देवानें घडविला?
अवतार ह्यांचा असतो जसा केवळ बायकांना छळायला
हट्ट गेला पुरुषाकडे बायकांकडे समजूत आली
वाटणाराही पुरुष होता, म्हणून अशी वांटणी झाली
आम्ही बायकाच वेड्या खऱ्या थोड्या स्तुतीनें सुखावतो
घरामध्येंच सारा आमचा जीव सदा घुटमळतो
गेलीं युगें, जातील युगें, होतील खूप सुधारणा
एक सत्य उरेल शेवटीं 'पुरुष स्वभाव बदलेना !'
असो! असेंच चालायचें, ह्याला नाहीं दुसरी तोड
असे कसे पुरुष बाई कामापुरते गोड गोड ॥४॥

—सौ. सुमती उपासनी; लातूर

# सुसरबाई! सुसरबाई! तुझीच पाठ मऊ!

खाणावळींतलं अन्न खाऊन जीव गेला विटून
लग्न केलं दोन खोल्यांत संसार दिला थाटून

गोड धोड, नरम गरम मिळूं लागलं घरीं
संध्याकाळीं वाट बघत राणी उभी दारी

पत्नीं होती सुगृहिणी संसार चालला झोकांत
पण एक वेड एकाएकीं शिरलें तिच्या डोक्यांत

समाज–सेवा, महिला मंडळ वाढत चालला व्याप
अन्न नाहीं वेळेंवरतीं माझें ओढवलें पाप

साम, धाम, दंड भेद सारं पाहिलं करून
दुसरे दिवशी फर्मान सुटलं 'माहेरीं जातें निघून'

गप्प बसलों उगीच कुठें शोभा करून घेऊं!
सुसरबाई, सुसरबाई तुमचीच पाठ मऊं ॥१॥

विहीणबाईची पंगत बसली, काय सांगू थाट
पुढें पाट मागें पाट, ठेवलं चांदींचं ताट

ताटाखालीं चंदनाचा चौरंग नक्षीदार
वाळा घालून सुवासाला पाणी ठेवलं गार

रंगीत रंगीत रांगोळ्यांची नक्षी काढली खास
मंद मधुर सगळीकडे उदबत्यांचा वास

लाडू, फेणी, खीर, बुंदी पक्वान्नांची रास
हळू हळू विहीणबाई घेऊं लागल्या घांस

सारं कांहीं ठीक होतं, पण लाडू गेला फुटून
पापड मोडला, विहीणी गेल्या पानावरून उठून

समजूत त्यांची घालतां घालतां नाकीं आले नऊ
सुसरबाई, सुसरबाई, तुमचीच पाठ मऊ ।।२।।

एक होतं ऑफिस तेथें एक होता कारकून
खर्डेघाशी करण्यांत गेली अर्धी उमर उलटून

वरीष्ठांची मर्जी होती, पण ते गेले बदलून
नवीन साहेब आले, सारें काम गेलें बिघडून

नवी विट्टी, नवे राज्य, तऱ्हा होती न्यारी
अक्कल कमी पण तब्येतीनं गरम होती स्वारी!

अनुभवी कारकुनाचें काम होतें चोख
साहेबाला होता फक्त देखाव्याचा शोक

लाचारीची कारकुनाला होती फार चीड
पण वढतीसाठी ठेवत होता वरिष्ठांची भीड

वर कांही लिहून धाडतील वाटत होता बाऊ
सुसरबाई सुसरबाई तुमचीच पाठ मऊ ॥ ३ ॥

बाई ठेवली घरकामास, ठरला भरपूर दाम
मला वाटलं आतां तरी मिळेल जरा आराम

कधीं उशीर. कधीं खाडा, रोज नवे थेर
खुर्चिवरती धूळ, सांठला कोपऱ्यामध्यें केर

चुरकुतलेले कपडे आणि जागोजागी डाग
ओशट चिकट भांडी पाहून मला आला राग

'कपडे जरा झटक, आणि भांडीं ठेव ओळींत
खुर्च्या ठेव टेबलाभोवतीं शीक थोडी रीत !'

'मला नाहीं जमणार बाई, असली कलाकुसरीं
पगार टाका उद्यापासून बाई बघा दुसरी'

पुन्हां नाहीं बोलणार असे, निघून नको जाऊं
सुसरबाई, सुसरबाई तुमचीच पाठ मऊ ॥४॥

— सुमती उपासनी; लातूर

# आले आले ज्ञानदेव

आळंदीच्या पालखीत  आले आले ज्ञानदेव ।।धृ।।
संतसंगे  भक्त मेळा  पुढे भाविकाची दाटी
ओवी अभंग मराठी  उधळीत  भक्तिभाव ।।१।।

पायवाट शृंगारिली  शिपुनिया  गंगाजळ
पाखरीते–पभावळ  दाही  दिशांचे  लाघव ।।२।।

भरावया पालखीची  खणा  नारळाची ओटी
मुक्ताइच्या भावासाठीं  सुहासिनी घेती धाव ।।३।।

न्हावूनिया अमृतात  शब्द गानी  हरीपाठ
मराठीचा  थाटमाट  मिरवीत  गांवोगांव ।।४।।

दिंडी आली भीमातटीं  आनंदली  चंद्रभागा
जळ  नाचवी  तरंगा  नाम गजराचा रव ।।५।।

हाक टाळ मृदगाची  देवाचिया  कानीपडे
विटेवरी  अवघडे  भेटीसाठी  घेइधांव ।।६।।

—श्री. दि. इनामदार

# हरली गवळण

तूं उसल्यावर
चार ऋतूंच्या
चार जणींनीं
मंत्र घातलें

टळें न बाधा
कळें न कांही
जखमेचा पण
जुळें न सांधा

चिघळण्यांतची
ओली खपली
धुंद होतसें
लंपट कारण

तुझी आठवण
फुंकर झाली
रे ! वनमाळी
हरली गवळण !

– श्री. दि. इनामदार

# हिरवीं गाणीं

अवखळ वारा रानीं शिरुनी
करी पिकांना गोड गुदगुल्या
हेतु मनींचे उमजुनि त्याच्या
ओंव्या माना डोलूं लागल्या-!

घइ विसावा किरण कोंवळें
टहाळावरल्या आंबीवरतीं
पाहुन कौतुक असलें त्याचें
जरा तडकली काळीं माती

जखमा हिरव्या सलत ठेवुनी
बघते करडी वाट कुणाची
शिरीं खोवुनी तुरे केशरी
कडेंस आतुर ही केंव्हांची—!

पोपटपंखो एक पांखरू
दृष्य मनोहर घेई टिपुनी
रानीं घुमती शीळ होऊनी
त्याच्या मनची हिरवीं गाणीं !

— ना. दि. देशमुख

# माझ्या मरणाचें गान —

तेव्हां दुपार भासली
मधु उमलतें फूल
राम मनांत झुलली
होउनि स्वप्नांची झूल
तेव्हां नव्हतेंच कांही
अति भयाण भकास
गोड लयींत स्पंदत
तेव्हां होतें माझे श्वास
तेव्हां विश्व भरलेलें
आणि मन भारलेलें
गान हृदयींचें माझ्या
सप्त सुरांत फुललेलें
आतां श्वासास लागली
माझ्या विचित्र ही धांप
रितें विश्वच सगळें
रिते मनाचें हि माप
आतां रात्रींत जळतें
माझ्या सुखाचें सरण
दुःखी एकतारी गातें
माझ्या मरणाचें गान ! !

— ना. दि. देशमुख

# कुणी धांवोत तयामागें

महालांच्यासाठीं निवडो कुणी शिखरें आणि पठारें
अन् कुंजामधूनी कोणा, विलासी वाहो वारें
उंच, उंच गोपुरें, अन् भव्य अशीं मंदिरें
ताज, मनोरे, कबरी, सुंदरतम् त्यांचीं शिखरें

कुणा सुखवोत, कुणा भुलवोत, कुणी धांवोत तयामागें
मला तर ती उदासीनता झोपड्यांतील आवडतें

दिपतील नेत्र कुणाचें तेजस्वी सप्त रंगतांत
वा कोजागिरीचा चंद्र, कधीं गायी उर्मी-गीत
लाखांनीं विजांचे मोती, नखऱ्यांत कुठे हि चमको
अन् अवसेच्या ही राती, दिन प्रकाश कोणी उजळो

कुणा सुखवोत कुणा भुलतो, कुणी धांवोत तयामागें
मला तर ती मिण मिणत्या दिव्याची जोत आवडतें

मैफील संगीताची रंगांत कुठें रंगु द्या
अन् सारंगीचें सूर नृत्यांत कुठें मिसळूं द्या
तबल्याच्या ठेक्यावरतीं जल्लोष कुठें चालूं द्या
मदिरेच्या चष्कामधुनी सौंदर्य कुणा प्राशूं द्या

कुणा सुखवोत, कुणा भुलवोत, कुणी धांवोत तयामागें
मला तर ती अंगाओी आईचीच आवडते

उन्मादीत नेत्रामधुनी सौंदर्य नाचतें जेथें
कुणी पागल असतें तेथें कुणी कुणास पागल करतें
शिकार करतां, बनतां, कुणी स्वतःस जाळुनी घेतें
अन् मृगजळाच्या मागें बेहोषी धांवतें तेथें

कुणा सुखवोत, कुणा भुलवोत, कुणी धांवोत तयामागें
मला तर ती समाधानी मिठींतील प्रीत आवडतें

कुठे गुलाब, जाओी, चांफा बेफाम सुगंध पसरितो
अन् फुत्कारींत नागांनाहि धुंदींत पहा झुलवितो
जव रातराणिचा गंध, रात्रीस रती बनवितो
अन् सात्विक चंदन जेथें कामातूर होऊन जगतो

कुणा सुखवोत, कुणा भुलवोत, कुणी धांवोत तयामागें
मला तर ती उपेक्षामय कन्हेरीच बा आवडतें.

- विजयेंद्र काबरा

# सासूचें मन

माझ्या दारीच्या चांफ्याला
आली जाई भेटायला
सोनियांच्या पावलानें
आली लक्ष्मी घराला

जेष्ठा कनिष्ठा या आल्या
रूप लेवून सुनांचें
आलें आनंदा उधाण
हेत पुरले मनीचे

सासुबाईचा गं दीप
घालुनिया तेलवात
आज दिला तुम्हां हातीं
ठेवा नित उजळत !

सुखें नांदा जपा नीट
सुत फेणीचे नाजुक
क्षणीं आम्हा विसाव्याला
आणा इवलें कौतुक

— सौ. लता बोधनकर

# शिदोरी

प्रश्न अनोळखी असे
नको विचारूं गं आई
खरंचगं सुखांत मी
तुझी पाठींशी पुण्याई ॥१॥
शिकविलें तू लेकिचा
जन्म सोन केळी परी
कोसळतां वीज शिरीं
गर्भ सुवर्णाचा धरी

उकळते उकळूं दे
आंत आटेल आधण
झांकण न काढी आई
हात भाजेल वाफेंन
तुझ्या प्रेमळ कुशींत
विसावूं दे क्षणभरीं
यांच क्षणांची बांधतें
नव्या धीराची शिदोरी

आई येतें मी प्रणाम
छे गं नेत्रीं आंसवे न
माय तात तुम्हां सम
उसळें हा अभिमान

—सौ. लता बोधनकर

# व्रत

मला सगळीच घाई
तुझी अबोध धीटाई;
लक्ष अभ्रें आलीं गेलीं
तरी तटस्थ निळाई.

येतां जातां कधीं तरी
एक घार वेड लावी ;
मात्र व्रतस्थ आकाशा
फक्त सुचतें जांभई

— लक्ष्मीकांत तांबोळी

# बाधा

मुक्त कुंतलीं जुई माळतां
सुगंधवेडे मन वावरतें
गूढ मधुरशा एकांताला
नि:शब्दाची बाधा जडतें

हरवुनि बसलें शब्द तरीहि
हरिणबावरी नजर बोलते
अन् स्मिताचें शरद चांदणें
तुला नको तें सांगून जातें

— हरिहर मातेकर

# गीत

मोरपंखी पापणींत
आर्त आतुरला प्राण
यावा हंसत श्रावण

यावा हंसत श्रावण
मुखी अमृताची धारा
ऋतुस्नात वसुंधरा

ऋतुस्नात वसुंधरा
गाभ्यांतून उमलतें
गीत सृजनाचें गातें

सृजनाच्या गीतांतून
प्रतिसृष्टि प्रसवते
जडे नक्षत्रांशीं नाते

—हरिहर मातेकर

# यमुना

आठवतं ?
तूं होणार होतीस राधा
अन् मी कृष्ण होणार होतों
पण थांब
तूं यमुनाच हो
जन्मोजन्मीं
तुझ्या कांठावर येतां येईल
अन् तुलाहि सांगतां येईल
"तुमच्याकडे निघालें होतें!"



—नरेंद्र चपळगांवकर

# तोऱ्यांत

तोऱ्यांत उतरल्या
गहिऱ्या श्रावण धारा
माळावर चळला—
चिंब रेशमी वारा
माथ्यावर मळली—
उतरण जळवंतीची
विस्कटली पेडीं
गंधित गर्भवतीची
आकाश हरवलें—
हिरव्या पदराखालीं
उमळला जलाशय—
कमल फुलें अवघडलीं .

— राम मुकादम

# तेव्हां–आतां

तेव्हां रात्र होती मोठी
अंकीं रुतलेल्या गती
रीती शोधल्या अनेक
नाहीं अनंताला क्षिति

तेव्हां रोधलेल्या श्वासीं
आस किती होती मोठी
नव्हती क्षीण एखादीहि
लाट सागराच्या कांठीं

आतां रात्र आहे छोटी
देठ वासनेचें खोल
तू तरी आहेस कां
तेव्हांइतुकी अबोल?

—प्रा. हेमचंद्र धर्माधिकारी

मराठा ग्रंथ सं... स्थळप्रत.
अनुक्र. ३५-३९० वि: काव्य
... नोंद दि. ५७-८-८३

# तूं —

नकोस लाजूं लाजाळूचें पान होऊनी
प्राजक्ताच्या देठामधली नकोस लाली उधळूं
कोरड माती ज्वालेवांचुन जळूं लागली
सुमनदलांचें रूप तुझें तूं नकोस बदलूं

हिरवेपण अंगावर ओढुन झांक यौवना
दलांत दडला सुगंध यावा वातावरनीं
कोरड माती ज्वालेंवाचुन जळूं लागली
चंद्र शोधितां नकोस विसरूं खालीं धरनी

वारा येईल तुझ्याकडे हा निमंत्रणाला
चंदनावरी सर्प झोपले त्यांना चिथवुन
कोरड माती ज्वालेवांचुन जळूं लागली
तुझ्या मनानें वाहत यावें गंगा होऊन

—गिरिबाल (कृष्ण व्यं. हवालदार)

# चित्र हांसते पंकज होउन

अंधाराला कळलें होतें
वाट रेशमी कुठें निघाली

दलास फुटल्या डोळ्यांमधुनी
विस्मयतेनें हांक मारिली

निळ्या नभाला पडली भोंकें
तारांचें मज दिसलें नर्तन

पायांमधली ताकद म्हणते
किती कणांचें घेऊं चुंबन

हिरवी पानें शीळ घालिती
झऱ्याकांठच्या भुताटकीला

भेदरलेल्या आशेला दे
प्रीत गुंगिचा अर्धा प्याला

झिंगत झिंगत वाट संपते
मऊ रेशमी पायाखालुन

शोण क्षणांचा तिथें संपतो
चित्र हांसते पंकज होउन

१३४८६

—गिरिबाल (कृष्ण …)

# जीवन लहरी

कृष्ण घन मेघ किती
दाटुनिया वनि आले ।
बिजलीचे सर्प किती
त्यांतून तें सळसळले !
तांडव हें वर्षेचें ।
तिमिराचें । प्रलयाचे ।
प्राशुनि परि तीच सुधा
नवजीवन घें वसुधा ।

२

हृदयीं नको रें वृक्षा,
आंस धरूं बिजलीची
कांतींत या लखलखत्या
चाहुल ये मृत्यूची
सुफलित जर होतील तव
अंतरिच्या आकांक्षा
हंसऱ्या ह्या हिरव्या ह्या
पर्णांची हो रक्षा

३

तुजसाठीं व्याकुळतें रात्रं दिनीं । रात्रं दिनीं ।
भेटीस्तव तळमळते नुसते चैतन्य मनीं
नयनांतुनीं नीर झरें
कंपित होतीं अधरें
विपरित परि प्रीत किती मौन घरीं येतां तूं

— सौ. मीना शिरवाडकर

# अमूर्त प्रीत

अमूर्त राहो माझी प्रीति
नकोस घालूं मखर-मंदिरें
वेढुं नको तिज संगमरवरें
अंतरिंचे वा वादळवारे
पसरूं दे तिज अनंत व्योमीं

नकोस घालूं उगाच तिजला
नवपुष्पांच्या सुगंधमाला
होतिल केवळ दुष्ट शृंखला
विहरूं दे तिज वाऱ्यावरती.

नील नभांतिल मुक्त पाखरूं
कठोर शर त्या नकोस मारूं
नकोस मातीमध्यें पसरूं
सुवर्णशोभा त्या पंखांची.

नवपर्णांतुन स्वैर फिरावें
तेज तारकांचें निरखावें
नील नभांतिल गूढ पहावें
नकोस पसरूं जाळें भवतीं.

— सौ. मीना शिरवाडकर

# फितूर

तव चुरगळलेलें वस्त्र जाहलें चूर
परि वस्त्रित झालें पुनःपुन्हां आतूर
तूं झांकुं पाहसी उघड झांप केव्हांची
पण नकळत मजला झालें काय फितूर!

कां काजळ भरले नयनहि आपोआप
सारखे उघडमीट करिती हे निश्वाप
कां ओंठावरतीं अळीमिळीची भाषा
काळजास लागे अवचित कोण धपाप!

कां आतां मुखावर अंचळ ओढुन घेसी
कां मान वाकडी इकडुन तिकडे नेसी?
कां अशी कुशीवर वळूं पाहसी मध्यें?
कां हाथ हालवुन उताण फेकुणीं देशी?

क्षण मुखीं तर्जनी, ओंठावर मग ताठ
'चुप' करूं पाहसी, दटाविसी डोळ्यांत
कां तरी कातरे ओसरण्यास पहासी
भरतीनें भरतां हृदयें कांठो कांठ !

—प. श्री. संभूस

# तूंच पुढें पाऊल टाक

निःसंकोच चमकणारी तूं
शुक्राची तेजस्वी चांदणी
अन् मी ...... ..
अंमळ लालसर, लाजरा, बुजरा मंगळ.
तुझ्या श्यामल रुपाची
खळाळणारी निळावंती न्यारी
स्थीर तुझ्या नजरेंतील
रुप्याचे चमकतें पाणी
माझें मात्र
बिथरलेले काळीज अन् अस्थिर वाणी
तूं क्षितिजावर दिसतेस
थोडाच वेळ सांज सकाळ
पण पाहतेस मात्र टक लावून
(तटस्थपणें ?)
मी मात्र......
नि त्याचाच डळमळलेला, घुटमळलेला
तुझ्या पायरीला माझे पाय
कदापिहि लागणार नाहींत
तूंच पाऊल पुढें टाक
एक पायरी खालीं उतरून
तूंच मला मार हांक!

—प. श्री. संभूस

# भाऊ-बीज

चांदीच्या त्या तबकांत
तेवें दीप -- नीरांजनीं
सुपारीस बिलगती
अक्षता त्या सुवर्णानीं! ...

होते मांगल्याचें तेथें
भावनांनीं भरलेले
नाजुक ते दोन कर
तबकास धरलेले ! ...

पाटावर बसलेलों
होतों मीहि तेथें आणि
भाऊ-बीज माझी होती
ओवाळीलें मज कोणी ! ! ...

—सनपूरकर

# रात्र होउनी आलेली तूं

फिकट उन्हाचा फिरतो बोळा
आकाशाच्या फलकावरुनी,
ताऱ्यांच्या संकेत लिपिंतिल
गूढ अक्षरें जाती पुसुनी.

झाडांच्या उबदार कुशींतुन
रानपांखरें हळूंच उठतीं,
गीत दंवाचें पहाट ओलें
गारठल्या चोचीनें गातीं.

निद्रित अर्ध्या पुसट धुक्यावर
वाऱ्याची अुमटतें पापणी..
...रात्र होअुनी आलेली तूं
विरून जाशी जशी चांदणी ....

—भास्कर भोळे

# आणखी ती रात जागी

आणखी ती रात जागी
जागी सदाची राहते
आणि तुझी आठवण
मनीं रंगते, झिंगते

आणखी तो क्षण जागा
जागा राहील सदाचा
रंध्रारंध्रांत शहारा
तृप्त ओल्या चांदण्याचा

ओल्या चांदण्याची सय
हृदयांत पिसाळते
तुझ्या डोळ्यांच्या मीलनीं
रोम रोम हे जागते.

—भुजंग वाडीकर

# जाणीव

रोज घडावें वाटतें
तुझ्या नेत्रांचें दर्शन
सुख संवादाखातर
हुरहुरें माझें मन.

रोजरोजचा निरोप
घ्याया आसुसतें मन
गूढ अंधारीं एकांतीं
थरथरे आठवण.

उजळती तुझ्या खुणा
उरीं घुमें आमंत्रण
रोजरोजचा हा जाच
मज सोसवेना पण!

तुझा सहवास सखे
थवथबलें चांदणें
तुझ्या नजरीं लाजतें
कांही नाहींचेंच उणें.

तुझी उत्कट ही प्रीत
वाटे अशी संपादीन
जाण बांधलेपणाची
सये निवळेना पण!

—भुजंग वाडीकर

# तुझ्या अडेल ओठांत

तुझ्या अडेल ओठांत
गेलें चांदणें थिजुन
किती वेळ गडे आतां
असें बसावें रुसून

माझ्या मनाचा चकोर
आला तृषार्त होऊन
बोल, बोल न गं जरा
झालें गेलें विसरून...

—शाम अग्रवाल

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 35391 दि: ........
क्रमांक ........................ नों दि: 17-8-83

# येतां हिर्वाळून कळ.....!

लाल चुटूक रंगाची येतां हिर्वाळून कळ
जळ, अभ्रकी हंसले हल्के सांवरीत तळ

दूर जांभळाच्या बनीं चिव् चिव् 'कल्लोळली'
शिवरांतली पोपटी गर्द शीळ चिघोरली.

हिरवी 'उलुशींच' शाळू आर्ली दूधाळ रंगांत
अिला, बघुं नये कोणी ओली न्हाताना दंवांत

'मुनशानच' धुक्यानें घातलेय भोंतीं 'कडे'
झांकू, लागला डोंगर प्राचीवरचें तांबडें.

डोअीं घेउनी पदर करी स्वागत 'जास्वंदी'
अन्! भूपाळी चालते खपरेली, घरामंदीं....!

—राजा मुकुंद

# वाटेवरची बोर

वयांत आली पोर पोरकी
वाटेवरची बोर खारकी.

ळींपिव पिवळीं लांबट बोरें–
पाहुन, जमुनी, म्हणती पोरें–
"या झुडुपाला मालक नाहीं.
खुशाल झोडा, दिक्कत नाहीं ।।

उनाड टप्पू खडे मारती.
भले दांडगे चढती वरतीं
आणि नेभळे मनांत झुरती–
ज्यांना नाहीं अटकळ पुरती–
वर चढण्याची.

वाटसरू तर येतां–जातां,
रुची बदलण्या जरा चाखती.
असाच सरतो मोसम सारा,
आणिक उरतो तिथेंच कचरा–
आठोळयांचा.

आणिक उरतीं झाडावरतीं
--फक्त पांढरीं-पिवळीं पानें
चटावलेले नेत्र हुडकती–
व्या पानांतुन पिवळीं बोरें,

तधीं विव्हळतें बोर पोरकी
उगाच दुबळ्या उद्वेगानें–
"झाडांनो, राहुं द्या, चार-
–पाखरांसाठीं."

—अंकुश

# प्रेमा तुझ्या आगमनें

प्रेमा, तुझ्या आगमनें
अंतरींच्या अंतरांत
लागे खुलाया डुलाया
स्नेह सौंदर्याचे कळे

अणु अणूच्या सांगातीं
हृदयींच्या गूढ व्यथा
लिहिल्या ज्या अदृष्टानं
त्याचे मोल आज कळे

परी अजून ही येथं
तेज तमांत स्फुंदते
तरी साक्षात सृष्टयाचे
पिकतात बाग मळे

मेघ मालेच्या अंतरीं
दु:ख विशाल कोंडले
इंद्र धनूच्या मायेंत
जाते रंगून स्नेहले

— माणीक मोताळे

# ‘श्रावण

# श्रावण’

दग्ध मृत्तिका, उदास जीवन, सरलें सिंचन,
श्याम घनांच्या आगमनाचें उरांत चिंतन,
विरें वसन्त नि तुटती तंतू रसगंधाचे
ग्रीष्मर्तूतच झुरें पाखरुं मुक्या मनाचें

—आणि अचानक मयुराचा मग फुले पिसारा,
धरतीवरतीं जलपुष्पांचा हले फुलोरा,
मृद्‌गंधाच्या वर्तुळांत मन पावन पावन
कळ्याफुलांतुन, जलबिंदूतुन ‘श्रावण श्रावण’

— चंद्रकांत पाटील

# सांजवात

उगी पूस डोळे पोरी
हाच जीवनाचा क्रम
होशील तूं आई, तेव्हां
फेडशील मातृऋण ॥१॥

एकानें गे मिटूनिया
दुज्यालातें फुलवावें
निर्मितीच्या बेहोषींत
दुजें जग विसरावें ॥२॥

पाणीदार डोळ्यांत
पाणी पुन्हां नको बाई
दृष्टावेल सोनकेळ
झाली शेजारीण सई ॥३॥

काढ माझी आठवण
लावतांना निरांजन
सांजवातीच्या प्रकाशीं
फळो फुलूं दे जीवन ॥४॥

—लक्ष्मी तनया

# वाट

चांफ्याखालीं वाट जरा घुटमळली वेडी
हिरवी झाडी, त्यांत तुझी अडखळली साडी
मधाळ हंसलिस रुसल्यावरती थवकुनि थोडी
मृदुल करांची कमरेभंवतीं पडली बेडी.

असा कांहिसा झिम्मा खेळुनि गेलिस पळुनी
मीहि कधींहि नाहीं पाहिलें मागें वळुनी
स्मरतें आहे दंवांत न्हालें विशाल भाल
थरथरणाऱ्या अधरीं अधिरे गुलाब–गाल.

स्मृतीच परि ही, कधीं विस्मृतित विलीन होईल
पुन्हां न मन्मन असलीं वेडीं गाणी गाइल,
–हन्त, परन्तु साङगत सुटतिल हिरवीं पातीं
"चांफ्याखालीं वाट जरा घुटमळली होती"

—मु. कृ गायकवाड

# तमांतील पायवाट

वड पारंब्या सोडून
उभा अंधुक निश्चल
निशेंतील हुंगे गंध
वृन्दावन दारांतील

चमके रात्रीच्या तमीं
लाल, मंदशी चांदणी.
मना आज डिवचिते
बात विषारी पुराणी.

वस्त्र कापितें तमाचें
गार वाऱ्याची ही सुरी,
तुझ्या स्मृति पेटविती
विरहाचा जाळ उरीं.

म्हणूनि तूं जोत्स्ना यावी
घेऊनिया क्षीर घट,
कराविस धुंद माझी
तमांतील पायवाट !

—भगवंत क्षीरसागर

# अशी अचानक

अशी अचानक
गाठ पडावी
दो नयनांची
मैत्री व्हावी ॥१॥

तुझ्या स्वरांची
चाहूल येतां
अेक उखाणा
हृदया खुलवी ॥२॥

अशी अचानक
गाठ पडावी
सप्तपदीवर
मैत्री व्हावी ॥३॥

प्रभाकर देशपांडे

# मातीच्या घरांत

मातीच्या घरांत
मृत्यूचे लेंढार
वासना गर्भार
राघु रंगी- १

मातीच्या घरांत
धाक दपटशा
संतत्वाच्या भाषा
-पिढ्याखालीं २

मातीच्या घरांत
जमा सिंहासनें
गुणीं संस्करणें
टांकसाळी ३

मातीच्या घरांत
मुका इतिहास,
जीवनाचा ध्यास
स्पंदमात्र ४

मातीच्या घरांत
श्रद्धा हंबरडे,
रसायनीं घडें
नीतिमत्व- ५

मातीच्या घरांत
अभेद स्वागत
धन, पक्ष, जात
एका ताटीं- ६

मातीच्या घरांत
मातीची आयात,
जीवन निर्यात
विश्वंभर. ७

—श. ना. वाघमारे

# रेंगाळते दारामध्यें

घोटाळती अंगणांत
साउलीचे मंद श्वास
वदलीतां बदलीना
नभ दुपारची कूस

भटकेना भिणी भिणी
वारा आतां माळावर
अंकूरहि डोकावेना
रोडावल्या तरुवर

टेकडीच्या अंतरांत
सले पिंगट उदासी
झळा यांनीं ठेचाळिल्या
काळ्या दगडांच्या राशी

नीरव या कपारींत
नदी झुरत एकली
वाट पाहून पाहून
वाट विचारी थकली

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व.
अनुक्रम 35370 वि: ...
क्रमांक ... नों. दि. ...
95-8-63

झाला पांढरा-फटिंग
उषेचा लाल चेहरा
वितळलें स्वप्न वेडे
आंत फुलला निखारा

पसरले सैरा वैरा
दुराव्याचे दीर्घ श्वास
बदलीता बदलीना
नभ दुपारची कूस

हटवितां हटे ना रे
तुझ्या अस्तित्वाचा भास
रेंगाळते दारामध्यें
सदा दुपार उदास

—विठ्ठल देशपांडे

# आंसू

हंसऱ्या... निळ्या डोळ्यांच्या
कोरींत तरळणारा,

सकम्प ... मृदु ... करुण ... ,
हळवा...आंसू टपोरा!

साकार त्यांत जाहलें
दु:ख दर्द जीवनाचें,

साकार त्यांत जाहलें
सुखस्वप्न नयनांचें!!

—इंद्रराव पवार

# घट

पायघोळ भिजलेला
भिजतो अन् घट रिताच.

मंथर पद रेलतात
बासरिच्या तालावर
यमुनेचे जलतुषार
अंग अंग ओलावत

डोईवर घट झुलतो
कमरेवर घट तसाच,
आणिक 'ते घट' फुलवित
ही घटमय ती राधा!

— यशवंत पत्की, परभणी

# प्रार्थना

होईल जेंव्हां मन हें उदास, वर्षाव तेंव्हां कर तूं कृपेचा
होता प्रभो जीवित हें असह्य पाजी मला तूं रस गायनाचा

चोहोकडोनी जंव काम मोठें, घेरील मातें बहु गोंधळानें
तेंव्हां प्रभो अंतरीं वास माझ्या राहो तुझा हा अति शांततेनें

जेंव्हां न होईलकृपा तुझी रे, दडेल माझें मन कोपऱ्यांत
तेंव्हां मनाचें उघडून दार राजाप्रमाणें वस तूं मनांत

लागेल अंगां धुळ वासनांची, अज्ञान जेंव्हां मनीं मोह राही
तेंव्हां प्रभो! मद्हृदयीं उठोनी मेघापरी गर्जत नित्य येई

('Rabindranath Tagore' यांच्या 'Prayer' गीताचा स्वैर अनुवाद)

—सुरेश मुळावेकर

# इरिंग मिरिंग...

इरींग मधल्ले रींग घेवूनी
मिरींग मधली मीरी खेळते–
रींग रींग रींग...

नवी पालवी जुन्याच-जागीं
कोळी विणतो नाजूक धागीं
मिचतो डावा डोळा जोगी
हिरवे बिल्वर किण् किण्ती

जीवनाची ठरीव वाट
तोच पेहराव तोच थाट
तेंच घरकूल तीच खाट
आशा तरीहि जळते जळते

—सतीश महाजन

# ‘नवा मनु नव्या दिशा’

शक्ती नवी जोम नवा
गीत नवें राग नवा
मान नवे दंड नवा
प्रीत नवी त्याग नवा
फूल नवें गंध नवा
फास नवे घाव नवा
तत्व नवें वाद नवा
शील नवें धर्म नवा
अफाट ह्या माळरानीं
ध्येय नवें वाट नवी
नवख्या ह्या पथिकाला
एक नवी साथ हवी

—अ सं. देशमुख

# प्रतिभेस ( जादुगारिण )

सुरुचिर स्वप्नांमधुनि मजला
दर्शन देऊनि कोण मोहवी
दिव्य स्पर्शातुनी मन्मनीं
कोण नव नवें भाव जागवी ॥१॥
सौंदर्याच्या स्वप्नामध्यें
कोण विश्व सुंदरी हांसते
नवविध भावांनीं मन्मनीं
श्रद्धेची नवज्योत तेवते ॥२॥
आदिकवीच्या नवछंदांतुन
कल्पनेंतुनी भूवर आली
व्यासमुनींच्या अमरवाणींतुन
सौंदर्यानें केंवी नटली ॥३॥
श्रद्धेतुन भाविक भक्तांच्या
अभंगरूपें अमर जाहली
ज्ञानोबाच्या ओवीमधुनि
सोनफूलापरी कोण हांसली? ॥४॥
नजरेची गुंजार पांखरे
उडवित हांसत नाचत आली
रुमझुम घुमघुम नुपूरांतुनि
अन् नृत्यांतुनि कोण प्रकटली? ॥५॥
चमचमतीं सोनेरी मंदिरें
सांगा हो ही कुणी बांधिलीं

शिल्पाच्या शिवसौंदर्यांतुन
        मोहकतेनें कोण प्रकटली? ॥६॥
दिव्यत्वाच्या भाषांमधुनि
कलारुपानें कोण हांसली
सौंदर्याची स्फूर्ति देवता
        कां मयुरावर स्वार जाहली? ॥७॥
वसून चमचमत्या लाटांवर
चंद्रिकेंतुनी कोण विहरते
शब्दार्थाच्या छंदामधुनि
        कोण देवता गाई गीतें? ॥८॥
मनामनाच्या नवश्रद्धेंतुन
निःश्वसितें ही कोण टाकते
मंगल वेदांच्या ऋचांतुन
        कोण नवनवा साज चढवितें? ॥९॥
जादुगारिण विश्वसुंदरी
मनुजाच्या कर्मांतुन हंसते
काळाच्या चंचल लाटांवर
        बसुनि कोण वीणेस छेडते? ॥१०॥
दिव्य अलौकिक प्रतिभादेवी
पावनतेची प्रभात करते
मंगल उज्ज्वल नवगीतांतुन
        चैतन्याची फूलें उधळितें ॥११॥

— अनंत जगताप

# आज आहे श्रद्धा

रस्त्याचीं
स्थिरतेवर
सुमनांची
फुलण्यावर
मरणाची
जगण्यावर
आज आहे मर्जिहि
कालाची
अवकाशीं
द्रव्याची
अविनाशीं
आशेची
जगण्याशी
आज आहे सलगी पण
अचला परि
अविरत जे
फुलणारे भावनिष्ठ
अविनाशी
द्रव्यासम
अवकाशीं
कालनिष्ठ
विज्ञानी नाकळते
संवेदन मग कण्हते
व्यथित जरी, संज्ञानीं
आज आहे श्रद्धा पण

— रामकृष्ण डिघोळकर

# पुनः प्रत्ययाच्या क्षणीं

झुळुक आली गवाक्षांतुन
तृप्तीचा निश्वास जणूं
काळ्या वटा थरथरल्या
अन् शहारलीं तनू

लपविशी जागेपणा
अंतरीच्या खळवळी
आतां बोलतात डोळे
अन् गालाची खळी

बाहुपाश स्वप्नांचा
तुला कांहीं सोडवेना
गूढ भाव विश्वाचा
बंध मना तोडवेना

नयनाच्या पाकळ्या
हळूं हळूं उमलल्या
उन्मादक गोड निद्रा
आली आतां संपायाला

रवि किरणाच्या स्पर्शें
स्वप्नें तुझी वितळली
पुनः प्रत्ययाच्या क्षणीं
झोप तुझी चाळवली!

—हरिकिशन राठौर 'मृदुल'

# ऑफिसचा रंग

पिवळें ऑफीस काळी पाटी
रोज पहातों पोटासाठीं ॥धृ॥
पिंगट खुर्ची टेबल तसलें
कपाट हिरवें उभें बापुडें
कार्बन काळा, निळ्या फायली
पिवळे कागद जिकडे तिकडे ॥१॥

हिरवट आहे 'बॉस' आमुचा
गोरा जरी तो वरूनि दिसतो
रागीट पिवळ्या त्या टाकानें
चुका तांबड्या पहा काढतो ॥२॥

टिक् टिक् चालें घटचाळ काळें
निळसर पंखा कधीं तर फिरतो
खाकी डगले घालि शिपाई
जीभ तांबडी सदा चावतो ॥३॥

दुपार पिवळी उदास बसते
निळ्या शाईचें काम चालतें
पिवळा हत्ती तपकिर थोडी
चहा तांबडा तलफ भागते ॥४॥

चिमणी काळा धूर ओकते
लाल लाख ती हळू पघळतें
पाकिट पिवळें सील तांबडे
तिकिट जांभळे लावून नटते ॥५॥

काळी एकच टंकलेखनीस
खिन्न मनाला भुरळ पाडते
लाल नखांची नाजुक बोटें
किट् किट् करतां डोके उठतें ॥६॥

रंग निराळे असे पाहुनी
रक्त तांबडे थिजून जातें
मनास उज्ज्वल आंकांक्षेचें
स्वप्न गुलाबी सदा टोचतें ॥७॥

— रघु बोरगांवकर, नांदेड

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर.
अनुक्रम ३५३१९ दि:
क्रमांक ..................... नों दि: १७-८-८३
१३४

# हें त्यांसी कां नच कळें?

भाव सागराच्या तळीं
वहरे मौक्तिकांचा मळा
फिरे तट घुंडाळीत
रत्नपारखी तो खुळा
जावें तळीं सागराच्या
हें त्यांसी कां नच कळे?

येतां गंध कस्तुरीचा
वेडे हरीण पिसाळे
प्राण लाउनी पणाला
शोधार्थ त्याच्याच पळे
त्याच्या जवळीच सांठा
हें त्यासी कां नच कळें?

राज्य भौतिक सुखाचें
आज जगावरी नांदे
विश्वशांतिचा गजर
दशदिशांत निनादे
तरी मन अशांत कां
हें मजसी नच्च कळें!

—सौ. कुंवरदेवी राठौर

## नयनांच्या दर्पणांत

नयनांच्या दर्पणांत
दिसतात भावरंग
उमलत्या माणसाच्या
पाकळ्यांचें हें तरंग ॥१॥

दृष्टादृष्ट अेक होता
तव देहीं फुले कांटा
"जातां नक्कोच विरह!"
दावितात नेत्र छटा ॥२॥

दुःखाळले भाव तुझे
अन् लागली झुरणी
कोमल त्या वेदनांचें
पाणी तरळें लोचनीं ॥३॥

–०–

नयनांच्या कोनांतून
मला जेव्हां बघतेंस
व्यथा सर्व विसरुनि
पुनिया लाजतेंस ॥४॥

REFBK-0013468
REFBK-0013468

— मधुकर गंगाधरराव चिखलीकर



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ८२८८